**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. ल. ग. चव्हाण,<br>शिवेश्वर कॉलनी, १९ बी, हर्सूल परिसर, औरंगाबाद | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन अपिलीय अधिकारी तथा उपसंचालक, नगर रचना, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| जन माहिती अधिकारी तथा नगर रचनाकार, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद | : | |
| मूळ अर्जदार श्री. गजानन संतुकराव देशमुख,रा. पिंपळगाव रेणूकाई, ता.भोकरदन,जि.जालना | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/३३४ | | |
| २ | प्रथम सुनावणीची तारीख | | दि. ०८-०४-२०११ |
| ३ | दिनांक ०८-०४-२०११ च्या सुनावणीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. ल. ग. चव्हाण व त्यांचे वकिल ॲड राम शेलकर | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा नगर रचनाकार, उपसंचालक, नगररचना कार्यालय,औरंगाबाद विभाग, औरंगाबाद - श्री. विश्वनाथ भागोजी दहे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा उपसंचालक, नगर रचना, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | द्वितीय सुनावणीची तारीख | | दि. ११-१०-२०११ |
| ५ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ५.१ | मूळ अर्जदार श्री. गजानन संतुकराव देशमुख,रा. पिंपळगाव रेणूकाई, ता.भोकरदन,जि.जालना | : | उपस्थित |

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १८-०१-२०१० |
| ७ | राज्य माहिती आयोगाकडे अपील दाखल केल्याची तारीख | दि. १९-०१-२०१० |
| ८ | अंतरीम आदेशाची तारीख | दि. ०८-०४-२०११ |
| ९ | अपील सुनावणीची तारीख | दि. ११-१०-२०११ |

२) या प्रकरणाची सुनावणी दिनांक ०८-०४-२०११ रोजी घेण्यात आली होती. त्यावेळी सुनावणीच्या वेळी मुळ माहिती अर्जातील त्रयस्थ (अपिलार्थी) श्री. ल.ग.चव्हाण त्यांचे वकिलासह (श्री.राम शेलकर), जन माहिती अधिकारी तथा नगर रचनाकार, उपसंचालक, नगररचना कार्यालय,औरंगाबाद उपस्थित होते. जन अपिलीय अधिकारी तथा उपसंचालक, नगररचना, औरंगाबाद अनुपस्थित होते.

३) जन माहिती अधिकारी यांनी या द्वितीय अपिलाची पार्श्वभूमी आयोगास खालीलप्रमाणे सादर केली होती.

३.१) मूळ अर्जदार श्री. गजानन संतुकराव देशमुख यांनी दि. २८.१०.२००९ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे त्यांच्या कार्यालयात कार्यरत असलेले स्वातंत्र्यसैनिक नामनिर्देशित कर्मचारी श्री.ल.ग.चव्हाण यांच्यासंदर्भात एकूण ९ विविध मुद्यांवर माहिती मागितली आहे. ही माहिती त्रयस्थ व्यक्तीशी संबंधित असल्याकारणाने माहिती अधिकार अधिनियमातील कलम ११ च्या तरतुदीनुसार त्रयस्थ श्री. ल.ग.चव्हाण यांना दि. ३१.१०.२००९ रोजीच्या पत्रान्वये अर्जदाराने मागितलेल्या माहितीबाबत त्यांची बाजू मांडण्याची जन माहिती अधिकारी यांनी संधी दिली. त्रयस्थ श्री. ल.ग.चव्हाण यांनी दि. ०९.११.२००९ अन्वये अर्जदार यांनी मागितलेली माहिती देण्यास हरकत घेतली व अर्जदाराने अपेक्षिलेली माहिती वैयक्तिक स्वरुपाची असल्याकारणाने सदर माहिती देण्यास स्पष्ट नकार दिला आहे. त्याबरहुकूम नगर रचनाकार यांनी त्यांच्या दि. २४.११.२००९ रोजीच्या पत्राद्वारे मूळ अर्जदार यांच्या दृष्टीक्षेपात ही बाब आणून त्यांनी मागितलेली माहिती कोणत्या लोकहितार्थ हेतूसाठी आवश्यक आहे, हे स्पष्ट होत नाही म्हणून माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ११ अन्वये ती देता येत नाही, असे कळविले आहे. अर्जदार यांनी जन माहिती अधिकारी यांच्या निर्णयावर दि. १०.१२.२००९ रोजी प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपील दाखल केले. त्यावर जन अपिलीय अधिकारी तथा उपसंचालक,नगर रचना यांनी सुनावणी घेऊन दि. १८.०१.२०१० रोजी निर्णय दिला आहे की, अर्जदार यांच्या दि. २९.१०.२००९ रोजीच्या मूळ अर्जानुसार अपेक्षिलेल्या माहितीतील नगर रचनाकार कार्यालयाच्या अभिलेखातील व नगर रचना प्राधिकरणाच्या इतर कार्यालयातील अभिलेखातून उपलब्ध असलेली मुद्दा क्र. १ ते ९ ची माहिती प्राप्त करुन घेऊन अर्जदारास विनामूल्य देण्यात यावी. असा निर्णय देताना अर्जदार यांनी मागितलेली माहिती गोपनीय स्वरुपाची नसून माहिती या संज्ञेमध्ये बसते व उक्त माहिती देण्याने त्रयस्थ पक्षाचे कोणतेही नुकसान होत नाही, असा निष्कर्ष काढला आहे. जन

अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाविरुध्द त्रयस्थ श्री. ल.ग.चव्हाण यांनी प्रस्तुत द्वितीय अपील आयोगापुढे केले आहे. त्रयस्थ श्री.ल.ग.चव्हाण या व्दितीय अपिलात आता अपिलार्थी बनत आहेत.

३.२) दिनांक ०८-०४-२०११ च्या रोजी सुनावणीच्या वेळी त्रयस्थ श्री.चव्हाण यांच्यातर्फे ॲड.श्री. राम शेलकर यांनी त्यांची बाजू मांडली. तसेच द्वितीय अपिलात लेखी युक्तिवाद सादर केला आहे. श्री. चव्हाण यांचे वकील यांनी सुनावणीच्यावेळी त्यांच्या युक्तिवादात असे प्रतिपादन केले की, मूळ अर्जदार यांनी मागितलेली माहिती त्रयस्थाशी (आता अपिलार्थीशी ) संबंधित आहे व ती अपिलार्थीच्या व्यक्तिगत जीवनामध्ये हस्तक्षेप करणारी असून माहिती उघड केल्याने त्यांचे जीवनात आगंतूक हस्तक्षेप होऊन त्यांचे जीवन व शारीरिक सुरक्षितता धोक्यात येईल त्याचप्रमाणे सदरची माहिती मूळ अर्जदारास देण्यामध्ये व्यापक जनहित काय साध्य होणार आहे, ही बाब स्पष्ट होत नाही. त्यामुळे प्रथम अपिलीय अधिकारी यांनी घेतलेला निर्णय रद्द करुन मूळ अर्जदार यांना त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेली माहिती देण्यात येऊ नये. माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या मुख्य शिर्षकानंतर व कलम एक च्या पूर्वी अधिनियमाची उद्दिष्टे दिलेली आहेत. या उद्दिष्टातील एका वाक्याचा येथे उल्लेख करावासा वाटतो तो असा की, ज्याअर्थी ज्यांना माहिती हवी आहे अशा नागरिकांना काही माहिती देण्यासाठी तरतूद करणे इष्ट आहे असा उल्लेख आहे. सदर अधिनियम फक्त नागरिकांना माहिती देण्याबाबत असून काही माहिती देण्याकरिता आहे. या अधिनियमानुसार कितीही माहिती उपलब्ध करुन देणे अपेक्षित नसून माहिती देण्यावर मर्यादा आहेत. अर्जदार हे बहुजन क्रांतीदलाचे संघटक असून अशा प्रकारच्या संघटकाला नागरिक म्हणता येऊ शकत नाही. तसेच मूळ अर्जदाराने पहिल्या अपिलात तथा या अपिलातही आपले लेखी किंवा तोंडी म्हणणे सादर केलेले नाही त्यामुळे मूळ अर्जदारास आपल्या माहितीचा रेटा कायम ठेवण्यामध्ये कोणतेही स्वारस्य नाही असे प्रथम दर्शनी आढळून येत आहे. मूळ अर्जदाराला माहितीचा रेटा कायम ठेवण्यामध्ये स्वारस्य नसल्याने या अपिलात माहिती उपलब्ध करुन देण्याबाबतचा निर्णय न्यायोचित ठरणार नाही म्हणूनही सदरचे अपील मंजूर करण्यात यावे व अर्जदाराने केलेली मागणी फेटाळण्यात यावी.

४) अपिलार्थीची बाजू अपिलार्थींच्या वकिलांच्या युक्तिवादामार्फत आयोगाने ऐकून घेतली. आयोगाने निष्कर्षाप्रत येण्यापूर्वी या प्रकरणात मूळ अर्जदार श्री. गजानन संतुकराव देशमुख यांना त्यांची बाजू मांडण्याकरिता संधी देण्यात यावी, असे आयोगाचे मत असल्याने प्रकरणाची सुनावणी पुढे चालू ठेवण्यात आली. पुढील सुनावणीच्या वेळी मूळ अर्जदार श्री. गजानन संतुकराव देशमुख यांना श्री.चव्हाण यांच्या संबंधित माहिती देण्यामुळे कोणते व्यापक जनहित साध्य होईल, यासंदर्भात त्यांचा लेखी अथवा मौखिक युक्तिवाद आयोगापुढे सादर करणे आवश्यक राहील. सदर सुनावणीस मूळ अर्जदार श्री. गजानन संतुकराव देशमुख,रा. पिंपळगाव रेणूकाई, ता. भोकरदन, जि. जालना यांना या सुनावणीस व्यक्तिशः उपस्थित राहावे लागेल. अन्यथा आयोगास वस्तुनिष्ठ निर्णय घ्यावा लागेल. या निष्कर्षाप्रत आयोग आल्यानंतर खालील अंतरीम आदेश देण्यात आले

" सदर प्रकरणाची सुनावणी पुढे चालू ठेवण्यात येत आहे. पुढील सुनावणीची तारीख यथावकाश कळविण्यात येईल. त्यावेळी मूळ अर्जदार श्री. गजानन संतुकराव देशमुख यांनी त्यांचा लेखी अथवा मौखिक युक्तिवाद आयोगासमोर सादर करावा."

५) आज दिनांक ११-१०-२०११ रोजी सुनावणीच्या वेळी अर्जदार श्री. गजानन देशमुख उपस्थित आहेत. त्यांनी त्यांच्या युक्तिवादात आयोगास अवगत केले की, स्वातंत्र्य सैनिकांच्या रक्ताच्या नात्यातील एका पाल्यास शासन सेवेमध्ये शासन निर्णयानुसार सामावून घेता येते. रक्ताच्या नात्यामध्ये स्वातंत्र्य सैनिकांची मुले, सख्खा भाऊ, बहिणीची मुले इत्यादीचा शासन आदेशामध्ये नमूद केल्याप्रमाणे समावेश होतो. ब-याच प्रकरणामध्ये अशा नात्याबाहेरील व्यक्तींना शासन सेवेत सामावून घेतले आहे व याकरिता त्यांना सदरची माहिति आवश्यक आहे. कारण यामध्ये व्यापक जनहित आहे. त्यांनी पुढे आयोगास असेही अवगत केले की, खालील गोष्टीवरुन स्वातंत्र्य सैनिकाच्या पाल्यास नियमानुसार नोकरी दिली आहे किंवा कसे हे सिध्द होऊ शकते. यास्तव त्यांची तेवढ्याच माहितीची आता मागणी आहे.

१. स्वातंत्र्य सैनिकांच्या सन्मानपत्राची व नामनिर्देशन पत्राची प्रत. (मुद्दा क्रमांक ५)

२. जिल्हाधिकारी कार्यालयाकडून नियुक्तीपूर्वी देण्यात आलेल्या NOC ची प्रत.

३. स्वातंत्र्य सैनिकांनी पाल्यास रक्ताच्या नात्यासंबंधी दिलेल्या शपथपत्राची प्रत. (मुद्दा क्रमांक ७)

४. ज्या पाल्यास नोकरी मिळाली आहे त्याकरिता स्वतंत्र सैनिकाने दिलेल्या शपथपत्राची प्रत. (मुद्दा क्रमांक ८)

अपिलार्थी यांनी त्यांची बाजू मांडल्यानंतर निर्णयासाठी प्रकरण राखून ठेवण्यात आले.

६) आयोगापुढे सादर करण्यात आलेली कागदपत्रे आयोगाने विचारात घेतली आहेत. तसेच आयोगापुढे दोन्ही बाजूतर्फे दिनांक ०८-०४-२०११ व ११-१०-२०११ रोजी युक्तिवाद करण्यात आला. या सर्व बाबींचा साकल्याने विचार करता खालील प्रश्न उपस्थित होतात.

६.१) अपिलकर्त्याने त्रयस्थाची मागितलेली माहिती वैयक्तीक स्वरुपाची आहे किवा कसे

या प्रश्नाचे उत्तर होय असे आहे. अपिलार्थी यांनी एकूण नऊ मुद्दयांवर माहिती मागितली आहे व ही माहिती शासकीय दप्तरी दाखल असली तरी त्रयस्थाच्या संदर्भात आहे. त्यापैकी किती माहिती कलम ८ मधील तरतुदीनुसार व्यापक जनहिताच्या कसोटीवर उतरत आहे हे पाहणे आवश्यक ठरत आहे.

६.२) त्रयस्थ हे शासकीय कर्मचारी आहेत त्यामुळे ते कलम ११ खाली त्रयस्थ होतात किंवा कसे.

वकिलांनी केलेल्या युक्तिवादानुसार अर्जदाराने त्रयस्थांची नावानिशी माहिती मागितली असल्याकारणाने ते सरकारी कर्मचारी असले तरी त्रयस्थ होतात व कलम ११ खाली त्यांची बाजू ऐकून घेणे जरुरीचे आहे व त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी त्रयस्थांची बाजू मांडण्याची संधी दिली आहे.

६.३) अर्जदारांनी मागितलेल्या माहितीपैकी कोणती माहिती सार्वजनिक कामकाजामध्ये निर्माण झाली आहे व कोणती माहिती वैयक्तीक स्वरुपात निर्माण झाली आहे.

माहिती अधिकार अधिनियमामधील तरतुदींचा विचार केल्यास मूळ अपिलार्थीने मागितलेली ही माहिती शासकीय कामकाजामध्ये निर्माण झालेली आहे किंवा शासकीय कार्यालयातर्फे निर्माण झालेली आहे किंवा शासनाशी केलेल्या पत्रव्यवहारामध्ये निर्माण झाली आहे त्यामुळे ती सर्व माहिती स्वाभाविकत:च सार्वजनिक स्वरुपाची (Public Domain) बनते. अर्जदाराने वर नमूद केलेल्या नऊ मुद्दयांमधील मुद्दा क्रमांक १, ३, ४, ५, ८ ही माहिती सार्वजनिक कामकाजामध्ये निर्माण झालेली आहे. मुद्दा क्रमांक २, ६, ७ व ९ ची माहिती वैयक्तीक स्वरुपाची आहे. या सर्व नऊ मुद्दयावरील माहिती त्रयस्थांशी संबंधित (Related) असल्याने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ८ च्या तरतुदीच्या अधिन राहून माहिती जाहीर (Disclose) करण्याचा निर्णय घेणे आवश्यक ठरत आहे.

६.४. व्यापक जनहिताबद्दलचे निकष.

माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ व कलम ११ नुसार माहिती जर त्रयस्थाबाबत असेल (related to third party) तेव्हा त्यांची बाजू ऐकूण घेणे आवश्यक आहे व त्यानंतर कलम ८ मधील विविध तरतुदीनुसार अपिलार्थीस माहिती देणे जनहिताच्या कसोटीवर उतरते का, ही बाब पाहणे आवश्यक आहे.

अर्जदाराने त्रयस्थांची मागितलेली मुद्दा क्रमांक २, ३ (काही माहिती) व ६ आणि ९ ची माहिती वैयक्तीक स्वरुपाची असल्याने व कलम ८ (१) (ज) नुसार व्यापक जनहिताच्या कसोटीवर उतरत नसल्याने त्यांना हि माहिती देय होणार नाही तथाापि मुद्दा क्रमांक १, ४, ५, ७, ८ बाबत व्यापक जनहिताचे निकष लागू होत असल्याने ही माहिती देय होते असे आयोगाचे मत आहे. सेवा पुस्तकाच्या प्रथम पानावर नमूद असलेल्या वैयक्तीक गोष्टी जसे जन्म खुणा, मूळ वास्तव्याचा पुरावा, टी. सी. इत्यादी बाबतची माहिती कलम ८ (१) मध्ये निर्देशित केल्याप्रमाणे देय होत नाही, परंतु उर्वरित माहिती ही जनहितामध्ये येत असल्याने ही माहिती कलम १० नुसार देय होत आहे.

६.५. त्रयस्थाने त्यांच्या जिवितास धोका निर्माण होईल ही जी भूमिका घेतली आहे व त्यांच्या वकिलाने युक्तिवाद केला आहे त्यावर माहिती देणे रोखता येईल किंवा कसे.

माहिती दिल्याने त्रयस्थाच्या शारीरिक सुरक्षतेस धोका उत्पन्न होऊ शकतो अशा फक्त शंकेवर (Apprehension) माहिती देणे रोखून धरता येत नाही असे आयोगाचे मत आहे. अत: कलम ८ (१) (छ) येथे लागू होत नाही.

६.६) अपिलार्थी हे बहुजन क्रांतीदलाचे संघटक आहेत म्हणून त्यांनी केलेला अर्ज नाकारण्यात येऊ शकतो का?

अर्जदार त्यांच्या संघटनेचे काही काम करत असतील व या अर्जाकरीता त्यांनी लेटरहेडचा वापर केला असेल तर त्यांनी संस्थेतर्फे माहिती मागितली आहे हे असे सिध्द होणे कठीण आहे. तसेच अपिलार्थी हे जरी एखाद्या संघटनेचे सदस्य असले तरी त्यांचे नागरिकत्व आबाधित राहते म्हणून त्यांना ही माहिती देय होत आहे.

७)	वरील सर्व बाबींचा साकल्याने विचार करता, मूळ अपिलार्थिने मागितलेल्या माहिती अर्जातील काही मुद्दे वगळता इतर मुद्यांना माहिती अधिकार अधिनियमातील कलम ८ (१) (ञ) मधील तरतुदी लागू होत नाहीत. त्याचप्रमाणे केवळ शंका ही माहिती न देण्यास पुरेशी ठरु शकणार नाही या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे. माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार माहिती ज्या स्वरूपात उपलब्ध आहे त्या स्वरूपात ती देणे आवश्यक आहे. माहिती तयार करुन देणे अभिप्रेत नाही. त्यामुळे अर्जदाराने विचारलेल्या माहितीपैकी जी माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपलब्ध आहे. ती माहिती जन माहिती अधिकारी तथा उपसंचालक, नगररचना कार्यालय,औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांना मूळ अर्जदारास द्यावी लागेल व तसेच जी माहिती त्यांच्या कार्यालयात उपलब्ध नाही त्याबाबत स्पष्टपणे मूळ अर्जदारास कळवावे लागेल.

८)	मूळ अपिलार्थी श्री. गजानन देशमुख यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास विनंती केली की, त्यांनी दिनांक २८-१०-२००९ रोजीच्या माहिती अर्जान्वये मागितलेल्या माहितीपैकी परिच्छेद ५ मध्ये नमूद केलेल्या माहितीच्या झेरॉक्स प्रती देण्यात याव्यात. या चार मुद्दयापैकी मुद्दा क्रमांक २ ची मागणी त्यांच्या मूळ अर्जामध्ये दिसून येत नाही, म्हणून त्यांना मुद्दा क्रमांक ५, ७ व ८ ची माहिती देण्यात यावी, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन माहिती अधिकारी तथा नगर रचनाकार, उपसंचालक, नगररचना कार्यालय, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांनी वर नमूद केल्याप्रमाणे (मूळ अर्जदार) श्री. गजानन देशमुख यांना मुद्दा क्रमांक ५, ७ व ८ बाबतची माहिती आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक	११-१०-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१.	श्री. गजानन संतुकराव देशमुख, रा. पिंपळगाव रेणूकाई, ता.भोकरदन, जिल्हा जालना.

२. श्री. ल. ग. चव्हाण, शिवेश्वर कॉलनी, १९ बी, हर्सूल परिसर, औरंगाबाद

३. जन माहिती अधिकारी तथा नगर रचनाकार, उपसंचालक, नगररचना कार्यालय, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जन अपिलीय अधिकारी तथा उपसंचालक, नगर रचना, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. र. म. पालिमकर,<br>व्दारा, सहायक संचालक, नगर रचना, औरंगाबाद,<br>डॉ. पेंडकर इमारत, जुब्ली पार्क, औरंगाबाद | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन अपिलीय अधिकारी तथा उपसंचालक, नगर रचना, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| जन माहिती अधिकारी तथा नगर रचनाकार, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद | : | |
| मूळ अर्जदार श्री. सुनिल साहेबराव मनोरे, रा. सिध्दार्थ बिल्डींग, भिमनगर, भावसिंगपुरा, औरंगाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/३३६ | | |
| २ | प्रथम सुनावणीची तारीख | | दि. ०८-०४-२०११ |
| ३ | दिनांक ०८-०४-२०११ च्या सुनावणीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. र. म. पालिमकर व त्यांचे वकिल ॲड राम शेलकर | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा नगर रचनाकार, उपसंचालक, नगररचना कार्यालय,औरंगाबाद विभाग, औरंगाबाद - श्री. विश्वनाथ भागोजी दहे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा उपसंचालक, नगर रचना, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | द्वितीय सुनावणीची तारीख | | दि. ११-१०-२०११ |
| ५ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ५.१ | मूळ अर्जदार श्री. सुनिल साहेबराव मनोरे, रा. सिध्दार्थ | : | उपस्थित |

बिल्डींग, भिमनगर, भावसिंगपुरा, औरंगाबाद

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १८-०१-२०१० |
| ७ | राज्य माहिती आयोगाकडे अपील दाखल केल्याची तारीख | दि. १९-०१-२०१० |
| ८ | अंतरीम आदेशाची तारीख | दि. ०८-०४-२०११ |
| ९ | अपील सुनावणीची तारीख | दि. ११-१०-२०११ |

२) या प्रकरणाची सुनावणी दिनांक ०८-०४-२०११ रोजी घेण्यात आली होती. त्यावेळी सुनावणीच्या वेळी मुळ माहिती अर्जातील त्रयस्थ (अपिलार्थी) श्री. र. म. पालिमकर त्यांचे वकिलासह (श्री.राम शेलकर), जन माहिती अधिकारी तथा नगर रचनाकार, उपसंचालक, नगररचना कार्यालय,औरंगाबाद उपस्थित होते. जन अपिलीय अधिकारी तथा उपसंचालक, नगररचना, औरंगाबाद अनुपस्थित होते.

३) जन माहिती अधिकारी यांनी या द्वितीय अपिलाची पार्श्वभूमी आयोगास खालीलप्रमाणे सादर केली होती.

३.१) मूळ अर्जदार श्री. सुनिल साहेबराव मनोरे यांनी दि. २९.१०.२००९ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे त्यांच्या कार्यालयात कार्यरत असलेले स्वातंत्र्यसैनिक नामनिर्देशित कर्मचारी श्री. र. म. पालिमकर यांच्यासंदर्भात एकूण ९ विविध मुद्यांवर माहिती मागितली आहे. ही माहिती त्रयस्थ व्यक्तीशी संबंधित असल्याकारणाने माहिती अधिकार अधिनियमातील कलम ११ च्या तरतुदीनुसार त्रयस्थ श्री. र. म. पालिमकर यांना दि. ३१.१०.२००९ रोजीच्या पत्रान्वये अर्जदाराने मागितलेल्या माहितीबाबत त्यांची बाजू मांडण्याची जन माहिती अधिकारी यांनी संधी दिली. त्रयस्थ श्री. र. म. पालिमकर यांनी दि. ०७.११.२००९ अन्वये अर्जदार यांनी मागितलेली माहिती देण्यास हरकत घेतली व अर्जदाराने अपेक्षिलेली माहिती वैयक्तिक स्वरुपाची असल्याकारणाने सदर माहिती देण्यास स्पष्ट नकार दिला आहे. त्याबरहुकूम नगर रचनाकार यांनी त्यांच्या दि. २४.११.२००९ रोजीच्या पत्राद्वारे मूळ अर्जदार यांच्या दृष्टीक्षेपात ही बाब आणून त्यांनी मागितलेली माहिती कोणत्या लोकहितार्थ हेतूसाठी आवश्यक आहे, हे स्पष्ट होत नाही म्हणून माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ११ अन्वये ती देता येत नाही, असे कळविले आहे. अर्जदार यांनी जन माहिती अधिकारी यांच्या निर्णयावर दि. १०.१२.२००९ रोजी प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपील दाखल केले. त्यावर जन अपिलीय अधिकारी तथा उपसंचालक,नगर रचना यांनी सुनावणी घेऊन दि. १८.०१.२०१० रोजी निर्णय दिला आहे की, अर्जदार यांच्या दि. २९.१०.२००९ रोजीच्या मूळ अर्जानुसार अपेक्षिलेल्या माहितीतील नगर रचनाकार कार्यालयाच्या अभिलेखातील व नगर रचना प्राधिकरणाच्या इतर कार्यालयातील अभिलेखातून उपलब्ध असलेली मुद्दा क्र. १ ते ९ ची माहिती प्राप्त करुन घेऊन अर्जदारास विनामूल्य देण्यात यावी. असा निर्णय देताना अर्जदार यांनी मागितलेली माहिती गोपनीय स्वरुपाची नसून माहिती या संज्ञेमध्ये बसते व

उक्त माहिती देण्याने त्रयस्थ पक्षाचे कोणतेही नुकसान होत नाही, असा निष्कर्ष काढला आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाविरुध्द त्रयस्थ श्री. र. म. पालिमकर यांनी प्रस्तुत द्वितीय अपील आयोगापुढे केले आहे. त्रयस्थ श्री. र. म. पालिमकर या व्दितीय अपिलात आता अपिलार्थी बनत आहेत.

३.२) दिनांक ०८-०४-२०११ च्या रोजी सुनावणीच्या वेळी त्रयस्थ श्री. र. म. पालिमकर यांच्यातर्फे ॲड.श्री. राम शेलकर यांनी त्यांची बाजू मांडली. तसेच द्वितीय अपिलात लेखी युक्तिवाद सादर केला आहे. श्री. पालिमकर यांचे वकील यांनी सुनावणीच्यावेळी त्यांच्या युक्तिवादात असे प्रतिपादन केले की, मूळ अर्जदार यांनी मागितलेली माहिती त्रयस्थाशी (आता अपिलार्थीशी ) संबंधित आहे व ती अपिलार्थीच्या व्यक्तिगत जीवनामध्ये हस्तक्षेप करणारी असून माहिती उघड केल्याने त्यांचे जीवनात आगंतूक हस्तक्षेप होऊन त्यांचे जीवन व शारीरिक सुरक्षितता धोक्यात येईल त्याचप्रमाणे सदरची माहिती मूळ अर्जदारास देण्यामध्ये व्यापक जनहित काय साध्य होणार आहे, ही बाब स्पष्ट होत नाही. त्यामुळे प्रथम अपिलीय अधिकारी यांनी घेतलेला निर्णय रद्द करुन मूळ अर्जदार यांना त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेली माहिती देण्यात येऊ नये. माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या मुख्य शिर्षकानंतर व कलम एक च्या पूर्वी अधिनियमाची उद्दिष्टे दिलेली आहेत. या उद्दिष्टातील एका वाक्याचा येथे उल्लेख करावासा वाटतो तो असा की, ज्याअर्थी ज्यांना माहिती हवी आहे अशा नागरिकांना काही माहिती देण्यासाठी तरतूद करणे इष्ट आहे असा उल्लेख आहे. सदर अधिनियम फक्त नागरिकांना माहिती देण्याबाबत असून काही माहिती देण्याकरिता आहे. या अधिनियमानुसार कितीही माहिती उपलब्ध करुन देणे अपेक्षित नसून माहिती देण्यावर मर्यादा आहेत. अर्जदार हे बहुजन क्रांतीदलाचे संघटक असून अशा प्रकारच्या संघटकाला नागरिक म्हणता येऊ शकत नाही. तसेच मूळ अर्जदाराने पहिल्या अपिलात तथा या अपिलातही आपले लेखी किंवा तोंडी म्हणणे सादर केलेले नाही त्यामुळे मूळ अर्जदारास आपल्या माहितीचा रेटा कायम ठेवण्यामध्ये कोणतेही स्वारस्य नाही असे प्रथम दर्शनी आढळून येत आहे. मूळ अर्जदाराला माहितीचा रेटा कायम ठेवण्यामध्ये स्वारस्य नसल्याने या अपिलात माहिती उपलब्ध करुन देण्याबाबतचा निर्णय न्यायोचित ठरणार नाही म्हणूनही सदरचे अपील मंजूर करण्यात यावे व अर्जदाराने केलेली मागणी फेटाळण्यात यावी.

४) अपिलार्थीची बाजू अपिलार्थींच्या वकिलांच्या युक्तिवादामार्फत आयोगाने ऐकून घेतली. आयोगाने निष्कर्षाप्रत येण्यापूर्वी या प्रकरणात मूळ अर्जदार श्री. सुनिल साहेबराव मनोरे यांना त्यांची बाजू मांडण्याकरिता संधी देण्यात यावी, असे आयोगाचे मत असल्याने प्रकरणाची सुनावणी पुढे चालू ठेवण्यात आली. पुढील सुनावणीच्या वेळी मूळ अर्जदार श्री. सुनिल साहेबराव मनोरे यांना श्री. र. म. पालिमकर यांच्या संबंधित माहिती देण्यामुळे कोणते व्यापक जनहित साध्य होईल, यासंदर्भात त्यांचा लेखी अथवा मौखिक युक्तिवाद आयोगापुढे सादर करणे आवश्यक राहील. सदर सुनावणीस मूळ अर्जदार श्री. सुनिल साहेबराव मनोरे, रा. सिध्दार्थ बिल्डींग, भिमनगर, भावसिंगपुरा, औरंगाबाद यांना या सुनावणीस व्यक्तिशः उपस्थित राहावे लागेल. अन्यथा

आयोगास वस्तुनिष्ठ निर्णय घ्यावा लागेल. या निष्कर्षाप्रत आयोग आल्यानंतर खालील अंतरीम आदेश देण्यात आले.

" सदर प्रकरणाची सुनावणी पुढे चालू ठेवण्यात येत आहे. पुढील सुनावणीची तारीख यथावकाश कळविण्यात येईल. त्यावेळी मूळ अर्जदार श्री. सुनिल साहेबराव मनोरे यांनी त्यांचा लेखी अथवा मौखिक युक्तिवाद आयोगासमोर सादर करावा."

५) आज दिनांक ११-१०-२०११ रोजी सुनावणीच्या वेळी अर्जदार श्री. सुनिल मनोरे उपस्थित आहेत. त्यांनी त्यांच्या युक्तिवादात आयोगास अवगत केले की, स्वातंत्र्य सैनिकांच्या रक्ताच्या नात्यातील एका पाल्यास शासन सेवेमध्ये शासन निर्णयानुसार सामावून घेता येते. रक्ताच्या नात्यामध्ये स्वातंत्र्य सैनिकांची मुले, सख्खा भाऊ, बहिणीची मुले इत्यादीचा शासन आदेशामध्ये नमूद केल्याप्रमाणे समावेश होतो. ब-याच प्रकरणामध्ये अशा नात्याबाहेरील व्यक्तींना शासन सेवेत सामावून घेतले आहे व याकरिता त्यांना सदरची माहिती आवश्यक आहे. कारण यामध्ये व्यापक जनहित आहे. त्यांनी पुढे आयोगास असेही अवगत केले की, खालील गोष्टीवरुन स्वातंत्र्य सैनिकाच्या पाल्यास नियमानुसार नोकरी दिली आहे किंवा कसे हे सिध्द होऊ शकते. यास्तव त्यांची तेवढ्याच माहितीची आता मागणी आहे.

१. स्वातंत्र्य सैनिकांच्या सन्मानपत्राची व नामनिर्देशन पत्राची प्रत. (मुद्दा क्रमांक ५)

२. जिल्हाधिकारी कार्यालयाकडून नियुक्तीपूर्वी देण्यात आलेल्या NOC ची प्रत.

३. स्वातंत्र्य सैनिकांनी पाल्यास रक्ताच्या नात्यासंबंधी दिलेल्या शपथपत्राची प्रत. (मुद्दा क्रमांक ७)

४. ज्या पाल्यास नोकरी मिळाली आहे त्याकरिता स्वतंत्र सैनिकाने दिलेल्या शपथपत्राची प्रत. (मुद्दा क्रमांक ८)

अपिलार्थी यांनी त्यांची बाजू मांडल्यानंतर निर्णयासाठी प्रकरण राखून ठेवण्यात आले.

६) आयोगापुढे सादर करण्यात आलेली कागदपत्रे आयोगाने विचारात घेतली आहेत. तसेच आयोगापुढे दोन्ही बाजूतर्फे दिनांक ०८-०४-२०११ व ११-१०-२०११ रोजी युक्तिवाद करण्यात आला. या सर्व बाबींचा साकल्याने विचार करता खालील प्रश्न उपस्थित होतात.

६.१) अपिलकर्त्याने त्रयस्थाची मागितलेली माहिती वैयक्तीक स्वरुपाची आहे किवा कसे

या प्रश्नाचे उत्तर होय असे आहे. अपिलार्थी यांनी एकूण नऊ मुद्दयांवर माहिती मागितली आहे व ही माहिती शासकीय दप्तरी दाखल असली तरी त्रयस्थाच्या संदर्भात आहे. त्यापैकी किती माहिती कलम ८ मधील तरतुदीनुसार व्यापक जनहिताच्या कसोटीवर उतरत आहे हे पाहणे आवश्यक ठरत आहे.

६.२) त्रयस्थ हे शासकीय कर्मचारी आहेत त्यामुळे ते कलम ११ खाली त्रयस्थ होतात किंवा कसे.

वकिलांनी केलेल्या युक्तिवादानुसार अर्जदाराने त्रयस्थांची नावानिशी माहिती मागितली असल्याकारणाने ते सरकारी कर्मचारी असले तरी त्रयस्थ होतात व कलम ११ खाली त्यांची बाजू ऐकून घेणे जरुरीचे आहे व त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी त्रयस्थांची बाजू मांडण्याची संधी दिली आहे.

६.३) अर्जदारांनी मागितलेल्या माहितीपैकी कोणती माहिती सार्वजनिक कामकाजामध्ये निर्माण झाली आहे व कोणती माहिती वैयक्तीक स्वरुपात निर्माण झाली आहे.

माहिती अधिकार अधिनियमामधील तरतुदींचा विचार केल्यास मूळ अपिलार्थीने मागितलेली ही माहिती शासकीय कामकाजामध्ये निर्माण झालेली आहे किंवा शासकीय कार्यालयातर्फे निर्माण झालेली आहे किंवा शासनाशी केलेल्या पत्रव्यवहारामध्ये निर्माण झाली आहे त्यामुळे ती सर्व माहिती स्वाभाविकत:च सार्वजनिक स्वरुपाची (Public Domain) बनते. अर्जदाराने वर नमूद केलेल्या नऊ मुद्दयांमधील मुद्दा क्रमांक १, ३, ४, ५, ८ ही माहिती सार्वजनिक कामकाजामध्ये निर्माण झालेली आहे. मुद्दा क्रमांक २, ६, ७ व ९ ची माहिती वैयक्तीक स्वरुपाची आहे. या सर्व नऊ मुद्दयावरील माहिती त्रयस्थांशी संबंधित (Related) असल्याने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ८ च्या तरतुदीच्या अधिन राहून माहिती जाहीर (Disclose) करण्याचा निर्णय घेणे आवश्यक ठरत आहे.

६.४. व्यापक जनहिताबद्दलचे निकष.

माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ व कलम ११ नुसार माहिती जर त्रयस्थाबाबत असेल (related to third party) तेव्हा त्यांची बाजू ऐकूण घेणे आवश्यक आहे व त्यानंतर कलम ८ मधील विविध तरतुदीनुसार अपिलार्थीस माहिती देणे जनहिताच्या कसोटीवर उतरते का, ही बाब पाहणे आवश्यक आहे.

अर्जदाराने त्रयस्थांची मागितलेली मुद्दा क्रमांक २, ३ (काही माहिती) व ६ आणि ९ ची माहिती वैयक्तीक स्वरुपाची असल्याने व कलम ८ (१) (ञ) नुसार व्यापक जनहिताच्या कसोटीवर उतरत नसल्याने त्यांना हि माहिती देय होणार नाही तथाापि मुद्दा क्रमांक १, ४, ५, ७, ८ बाबत व्यापक जनहिताचे निकष लागू होत असल्याने ही माहिती देय होते असे आयोगाचे मत आहे. सेवा पुस्तकाच्या प्रथम पानावर नमूद असलेल्या वैयक्तीक गोष्टी जसे जन्म खुणा, मूळ वास्तव्याचा पुरावा, टी. सी. इत्यादी बाबतची माहिती कलम ८ (१) मध्ये निर्देशित केल्याप्रमाणे देय होत नाही, पंरतु उर्वरित माहिती ही जनहितामध्ये येत असल्याने ही माहिती कलम १० नुसार देय होत आहे.

६.५. त्रयस्थाने त्यांच्या जिवितास धोका निर्माण होईल ही जी भूमिका घेतली आहे व त्यांच्या वकिलाने युक्तिवाद केला आहे त्यावर माहिती देणे रोखता येईल किंवा कसे.

माहिती दिल्याने त्रयस्थाच्या शारीरिक सुरक्षतेस धोका उत्पन्न होऊ शकतो अशा फक्त शंकेवर (Apprehension) माहिती देणे रोखून धरता येत नाही असे आयोगाचे मत आहे. अत: कलम ८ (१) (छ) येथे लागू होत नाही.

६.६) अपिलार्थी हे बहुजन क्रांतीदलाचे संघटक आहेत म्हणून त्यांनी केलेला अर्ज नाकारण्यात येऊ शकतो का?

अर्जदार त्यांच्या संघटनेचे काही काम करत असतील व या अर्जाकरीता त्यांनी लेटरहेडचा वापर केला असेल तर त्यांनी संस्थेतर्फे माहिती मागितली आहे हे असे सिध्द होणे कठीण आहे.

तसेच अपिलार्थी हे जरी एखाद्या संघटनेचे  सदस्य असले तरी त्यांचे नागरिकत्व आबाधित राहते म्हणून त्यांना ही माहिती देय होत आहे.

७)  वरील सर्व बाबींचा साकल्याने विचार करता, मूळ अपिलार्थिने मागितलेल्या माहिती अर्जातील काही मुद्दे वगळता इतर मुद्यांना माहिती अधिकार अधिनियमातील कलम ८ (१) (ज्ञ) मधील तरतुदी लागू होत नाहीत.  त्याचप्रमाणे केवळ शंका ही माहिती न देण्यास पुरेशी ठरु शकणार नाही या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.  माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार माहिती ज्या स्वरूपात उपलब्ध आहे त्या स्वरूपात ती देणे आवश्यक आहे.  माहिती तयार करुन देणे अभिप्रेत नाही.  त्यामुळे अर्जदाराने विचारलेल्या माहितीपैकी जी माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपलब्ध आहे. ती माहिती जन माहिती अधिकारी तथा उपसंचालक, नगररचना कार्यालय,औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांना मूळ अर्जदारास द्यावी लागेल व तसेच जी माहिती त्यांच्या कार्यालयात उपलब्ध नाही त्याबाबत स्पष्टपणे मूळ अर्जदारास कळवावे लागेल.

८)  मूळ अपिलार्थी श्री. सुनिल मनोरे यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास विनंती केली की, त्यांनी दिनांक २८-१०-२००९ रोजीच्या माहिती अर्जान्वये मागितलेल्या माहितीपैकी परिच्छेद ५ मध्ये नमूद केलेल्या माहितीच्या झेरॉक्स प्रती देण्यात याव्यात.  या चार मुद्दयापैकी मुद्दा क्रमांक २ ची मागणी त्यांच्या मूळ अर्जामध्ये दिसून येत नाही, म्हणून त्यांना मुद्दा क्रमांक ५, ७ व ८ ची माहिती देण्यात यावी, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन माहिती अधिकारी तथा नगर रचनाकार, उपसंचालक, नगररचना कार्यालय, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांनी वर नमूद केल्याप्रमाणे (मूळ अर्जदार) श्री. सुनिल साहेबराव मनोरे यांना मुद्दा क्रमांक ५, ७ व ८ बाबतची माहिती आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक  ११-१०-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सुनिल साहेबराव मनोरे, रा. सिध्दार्थ बिल्डींग, भिमनगर, भावसिंगपुरा, औरंगाबाद.

२. श्री. र. म. पालिमकर, व्दारा, सहायक संचालक, नगर रचना, औरंगाबाद, डॉ. पेंडकर इमारत, जुब्ली पार्क, औरंगाबाद.

३. जन माहिती अधिकारी तथा नगर रचनाकार, उपसंचालक, नगररचना कार्यालय, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जन अपिलीय अधिकारी तथा उपसंचालक, नगर रचना, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. सु. उ. मापारी,<br>१२४, श्रीकृष्णनगर, शहानुरवाडी, औरंगाबाद | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन अपिलीय अधिकारी तथा उपसंचालक, नगर रचना, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| जन माहिती अधिकारी तथा नगर रचनाकार, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद | : | |
| मूळ अर्जदार श्री. सुनिल साहेबराव मनोरे, रा. सिध्दार्थ बिल्डींग, भिमनगर, भावसिंगपुरा, औरंगाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/३३५ | | |
| २ | प्रथम सुनावणीची तारीख | | दि. ०८-०४-२०११ |
| ३ | दिनांक ०८-०४-२०११ च्या सुनावणीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. सु. उ. मापारी व त्यांचे वकिल ॲड राम शेलकर | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा नगर रचनाकार, उपसंचालक, नगररचना कार्यालय,औरंगाबाद विभाग, औरंगाबाद - श्री. विश्वनाथ भागोजी दहे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा उपसंचालक, नगर रचना, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | द्वितीय सुनावणीची तारीख | | दि. ११-१०-२०११ |
| ५ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ५.१ | मूळ अर्जदार श्री. सुनिल साहेबराव मनोरे, रा. सिध्दार्थ | : | उपस्थित |

बिल्डींग, भिमनगर, भावसिंगपुरा, औरंगाबाद

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १८-०१-२०१० |
| ७ | राज्य माहिती आयोगाकडे अपील दाखल केल्याची तारीख | दि. १९-०१-२०१० |
| ८ | अंतरीम आदेशाची तारीख | दि. ०८-०४-२०११ |
| ९ | अपील सुनावणीची तारीख | दि. ११-१०-२०११ |

२) या प्रकरणाची सुनावणी दिनांक ०८-०४-२०११ रोजी घेण्यात आली होती. त्यावेळी सुनावणीच्या वेळी मुळ माहिती अर्जातील त्रयस्थ (अपिलार्थी) श्री. सु. उ. मापारी त्यांचे वकिलासह (श्री.राम शेलकर), जन माहिती अधिकारी तथा नगर रचनाकार, उपसंचालक, नगररचना कार्यालय,औरंगाबाद उपस्थित होते. जन अपिलीय अधिकारी तथा उपसंचालक, नगररचना, औरंगाबाद अनुपस्थित होते.

३) जन माहिती अधिकारी यांनी या द्वितीय अपिलाची पार्श्वभूमी आयोगास खालीलप्रमाणे सादर केली होती.

३.१) मूळ अर्जदार श्री. सुनिल साहेबराव मनोरे यांनी दि. २९.१०.२००९ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे त्यांच्या कार्यालयात कार्यरत असलेले स्वातंत्र्यसैनिक नामनिर्देशित कर्मचारी श्री. सु. उ. मापारी यांच्यासंदर्भात एकूण ९ विविध मुद्यांवर माहिती मागितली आहे. ही माहिती त्रयस्थ व्यक्तीशी संबंधित असल्याकारणाने माहिती अधिकार अधिनियमातील कलम ११ च्या तरतुदीनुसार त्रयस्थ श्री. सु. उ. मापारी यांना दि. ३१.१०.२००९ रोजीच्या पत्रान्वये अर्जदाराने मागितलेल्या माहितीबाबत त्यांची बाजू मांडण्याची जन माहिती अधिकारी यांनी संधी दिली. त्रयस्थ श्री. सु. उ. मापारी यांनी दि. ०७.११.२००९ अन्वये अर्जदार यांनी मागितलेली माहिती देण्यास हरकत घेतली व अर्जदाराने अपेक्षिलेली माहिती वैयक्तिक स्वरुपाची असल्याकारणाने सदर माहिती देण्यास स्पष्ट नकार दिला आहे. त्याबरहुकूम नगर रचनाकार यांनी त्यांच्या दि. २४.११.२००९ रोजीच्या पत्राद्वारे मूळ अर्जदार यांच्या दृष्टीक्षेपात ही बाब आणून त्यांनी मागितलेली माहिती कोणत्या लोकहितार्थ हेतूसाठी आवश्यक आहे, हे स्पष्ट होत नाही म्हणून माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ११ अन्वये ती देता येत नाही, असे कळविले आहे. अर्जदार यांनी जन माहिती अधिकारी यांच्या निर्णयावर दि. १०.१२.२००९ रोजी प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपील दाखल केले. त्यावर जन अपिलीय अधिकारी तथा उपसंचालक,नगर रचना यांनी सुनावणी घेऊन दि. १८.०१.२०१० रोजी निर्णय दिला आहे की, अर्जदार यांच्या दि. २९.१०.२००९ रोजीच्या मूळ अर्जानुसार अपेक्षिलेल्या माहितीतील नगर रचनाकार कार्यालयाच्या अभिलेखातील व नगर रचना प्राधिकरणाच्या इतर कार्यालयातील अभिलेखातून उपलब्ध असलेली मुद्दा क्र. १ ते ९ ची माहिती प्राप्त करुन घेऊन अर्जदारास विनामूल्य देण्यात यावी. असा निर्णय देताना अर्जदार यांनी मागितलेली माहिती गोपनीय स्वरुपाची नसून माहिती या संज्ञेमध्ये बसते व उक्त माहिती देण्याने

त्रयस्थ पक्षाचे कोणतेही नुकसान होत नाही, असा निष्कर्ष काढला आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाविरुध्द त्रयस्थ श्री. सु. उ. मापारी यांनी प्रस्तुत द्वितीय अपील आयोगापुढे केले आहे. त्रयस्थ श्री. सु.उ. मापारी या व्दितीय अपिलात आता अपिलार्थी बनत आहेत.

३.२) दिनांक ०८-०४-२०११ च्या रोजी सुनावणीच्या वेळी त्रयस्थ श्री. सु. उ. मापारी यांच्यातर्फे ॲड.श्री. राम शेलकर यांनी त्यांची बाजू मांडली. तसेच द्वितीय अपिलात लेखी युक्तिवाद सादर केला आहे. श्री. सु. उ. मापारी यांचे वकील यांनी सुनावणीच्यावेळी त्यांच्या युक्तिवादात असे प्रतिपादन केले की, मूळ अर्जदार यांनी मागितलेली माहिती त्रयस्थाशी (आता अपिलार्थीशी ) संबंधित आहे व ती अपिलार्थीच्या व्यक्तिगत जीवनामध्ये हस्तक्षेप करणारी असून माहिती उघड केल्याने त्यांचे जीवनात आगंतूक हस्तक्षेप होऊन त्यांचे जीवन व शारीरिक सुरक्षितता धोक्यात येईल त्याचप्रमाणे सदरची माहिती मूळ अर्जदारास देण्यामध्ये व्यापक जनहित काय साध्य होणार आहे, ही बाब स्पष्ट होत नाही. त्यामुळे प्रथम अपिलीय अधिकारी यांनी घेतलेला निर्णय रद्द करुन मूळ अर्जदार यांना त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेली माहिती देण्यात येऊ नये. माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या मुख्य शिर्षकानंतर व कलम एक च्या पूर्वी अधिनियमाची उद्दिष्टे दिलेली आहेत. या उद्दिष्टातील एका वाक्याचा येथे उल्लेख करावासा वाटतो तो असा की, ज्याअर्थी ज्यांना माहिती हवी आहे अशा नागरिकांना काही माहिती देण्यासाठी तरतूद करणे इष्ट आहे असा उल्लेख आहे. सदर अधिनियम फक्त नागरिकांना माहिती देण्याबाबत असून काही माहिती देण्याकरिता आहे. या अधिनियमानुसार कितीही माहिती उपलब्ध करुन देणे अपेक्षित नसून माहिती देण्यावर मर्यादा आहेत. अर्जदार हे बहुजन क्रांतीदलाचे संघटक असून अशा प्रकारच्या संघटकाला नागरिक म्हणता येऊ शकत नाही. तसेच मूळ अर्जदाराने पहिल्या अपिलात तथा या अपिलातही आपले लेखी किंवा तोंडी म्हणणे सादर केलेले नाही त्यामुळे मूळ अर्जदारास आपल्या माहितीचा रेटा कायम ठेवण्यामध्ये कोणतेही स्वारस्य नाही असे प्रथम दर्शनी आढळून येत आहे. मूळ अर्जदाराला माहितीचा रेटा कायम ठेवण्यामध्ये स्वारस्य नसल्याने या अपिलात माहिती उपलब्ध करुन देण्याबाबतचा निर्णय न्यायोचित ठरणार नाही म्हणूनही सदरचे अपील मंजूर करण्यात यावे व अर्जदाराने केलेली मागणी फेटाळण्यात यावी.

४) अपिलार्थीची बाजू अपिलार्थींच्या वकिलांच्या युक्तिवादामार्फत आयोगाने ऐकून घेतली. आयोगाने निष्कर्षाप्रत येण्यापूर्वी या प्रकरणात मूळ अर्जदार श्री. सुनिल साहेबराव मनोरे यांना त्यांची बाजू मांडण्याकरिता संधी देण्यात यावी, असे आयोगाचे मत असल्याने प्रकरणाची सुनावणी पुढे चालू ठेवण्यात आली. पुढील सुनावणीच्या वेळी मूळ अर्जदार श्री. सुनिल साहेबराव मनोरे यांना श्री. मापारी यांच्या संबंधित माहिती देण्यामुळे कोणते व्यापक जनहित साध्य होईल, यासंदर्भात त्यांचा लेखी अथवा मौखिक युक्तिवाद आयोगापुढे सादर करणे आवश्यक राहील. सदर सुनावणीस मूळ अर्जदार श्री. सुनिल साहेबराव मनोरे, रा. सिध्दार्थ बिल्डींग, भिमनगर, भावसिंगपुरा, औरंगाबाद यांना या सुनावणीस व्यक्तिशः उपस्थित राहावे लागेल. अन्यथा आयोगास वस्तुनिष्ठ निर्णय घ्यावा लागेल. या निष्कर्षाप्रत आयोग आल्यानंतर खालील अंतरीम आदेश देण्यात आले

" सदर प्रकरणाची सुनावणी पुढे चालू ठेवण्यात येत आहे. पुढील सुनावणीची तारीख यथावकाश कळविण्यात येईल. त्यावेळी मूळ अर्जदार श्री. सुनिल साहेबराव मनोरे यांनी त्यांचा लेखी अथवा मौखिक युक्तिवाद आयोगासमोर सादर करावा."

५) आज दिनांक ११-१०-२०११ रोजी सुनावणीच्या वेळी अर्जदार श्री. सुनिल मनोरे उपस्थित आहेत. त्यांनी त्यांच्या युक्तिवादात आयोगास अवगत केले की, स्वातंत्र्य सैनिकांच्या रक्ताच्या नात्यातील एका पाल्यास शासन सेवेमध्ये शासन निर्णयानुसार सामावून घेता येते. रक्ताच्या नात्यामध्ये स्वातंत्र्य सैनिकांची मुले, सख्खा भाऊ, बहिणीची मुले इत्यादीचा शासन आदेशामध्ये नमूद केल्याप्रमाणे समावेश होतो. ब-याच प्रकरणामध्ये अशा नात्याबाहेरील व्यक्तींना शासन सेवेत सामावून घेतले आहे व याकरिता त्यांना सदरची माहिती आवश्यक आहे. कारण यामध्ये व्यापक जनहित आहे. त्यांनी पुढे आयोगास असेही अवगत केले की, खालील गोष्टीवरुन स्वातंत्र्य सैनिकाच्या पाल्यास नियमानुसार नोकरी दिली आहे किंवा कसे हे सिध्द होऊ शकते. यास्तव त्यांची तेवढ्याच माहितीची आता मागणी आहे.

१. स्वातंत्र्य सैनिकांच्या सन्मानपत्राची व नामनिर्देशन पत्राची प्रत. (मुद्दा क्रमांक ५)

२. जिल्हाधिकारी कार्यालयाकडून नियुक्तीपूर्वी देण्यात आलेल्या NOC ची प्रत.

३. स्वातंत्र्य सैनिकांनी पाल्यास रक्ताच्या नात्यासंबंधी दिलेल्या शपथपत्राची प्रत. (मुद्दा क्रमांक ७)

४. ज्या पाल्यास नोकरी मिळाली आहे त्याकरिता स्वतंत्र सैनिकाने दिलेल्या शपथपत्राची प्रत. (मुद्दा क्रमांक ८)

अपिलार्थी यांनी त्यांची बाजू मांडल्यानंतर निर्णयासाठी प्रकरण राखून ठेवण्यात आले.

६) आयोगापुढे सादर करण्यात आलेली कागदपत्रे आयोगाने विचारात घेतली आहेत. तसेच आयोगापुढे दोन्ही बाजूतर्फे दिनांक ०८-०४-२०११ व ११-१०-२०११ रोजी युक्तिवाद करण्यात आला. या सर्व बाबींचा साकल्याने विचार करता खालील प्रश्न उपस्थित होतात.

६.१) अपिलकर्त्याने त्रयस्थाची मागितलेली माहिती वैयक्तीक स्वरुपाची आहे किवा कसे

या प्रश्नाचे उत्तर होय असे आहे. अपिलार्थी यांनी एकूण नऊ मुद्दयांवर माहिती मागितली आहे व ही माहिती शासकीय दप्तरी दाखल असली तरी त्रयस्थाच्या संदर्भात आहे. त्यापैकी किती माहिती कलम ८ मधील तरतुदीनुसार व्यापक जनहिताच्या कसोटीवर उतरत आहे हे पाहणे आवश्यक ठरत आहे.

६.२) त्रयस्थ हे शासकीय कर्मचारी आहेत त्यामुळे ते कलम ११ खाली त्रयस्थ होतात किंवा कसे.

वकिलांनी केलेल्या युक्तिवादानुसार अर्जदाराने त्रयस्थांची नावानिशी माहिती मागितली असल्याकारणाने ते सरकारी कर्मचारी असले तरी त्रयस्थ होतात व कलम ११ खाली त्यांची बाजू ऐकून घेणे जरुरीचे आहे व त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी त्रयस्थांची बाजू मांडण्याची संधी दिली आहे.

६.३) अर्जदारांनी मागितलेल्या माहितीपैकी कोणती माहिती सार्वजनिक कामकाजामध्ये निर्माण झाली आहे व कोणती माहिती वैयक्तीक स्वरुपात निर्माण झाली आहे.

माहिती अधिकार अधिनियमामधील तरतुदींचा विचार केल्यास मूळ अपिलार्थीने मागितलेली ही माहिती शासकीय कामकाजामध्ये निर्माण झालेली आहे किंवा शासकीय कार्यालयातर्फे निर्माण झालेली आहे किंवा शासनाशी केलेल्या पत्रव्यवहारामध्ये निर्माण झाली आहे त्यामुऴे ती सर्व माहिती स्वाभाविकत:च सार्वजनिक स्वरुपाची (Public Domain) बनते. अर्जदाराने वर नमूद केलेल्या नऊ मुद्दयांमधील मुद्दा क्रमांक १, ३, ४, ५, ८ ही माहिती सार्वजनिक कामकाजामध्ये निर्माण झालेली आहे. मुद्दा क्रमांक २, ६, ७ व ९ ची माहिती वैयक्तीक स्वरुपाची आहे. या सर्व नऊ मुद्दयावरील माहिती त्रयस्थांशी संबंधित (Related) असल्याने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ८ च्या तरतुदीच्या अधिन राहून माहिती जाहीर (Disclose) करण्याचा निर्णय घेणे आवश्यक ठरत आहे.

६.४. व्यापक जनहिताबद्दलचे निकष.

माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ व कलम ११ नुसार माहिती जर त्रयस्थाबाबत असेल (related to third party) तेव्हा त्यांची बाजू ऐकूण घेणे आवश्यक आहे व त्यानंतर कलम ८ मधील विविध तरतुदीनुसार अपिलार्थीस माहिती देणे जनहिताच्या कसोटीवर उतरते का, ही बाब पाहणे आवश्यक आहे.

अर्जदाराने त्रयस्थांची मागितलेली मुद्दा क्रमांक २, ३ (काही माहिती) व ६ आणि ९ ची माहिती वैयक्तीक स्वरुपाची असल्याने व कलम ८ (१) (ञ) नुसार व्यापक जनहिताच्या कसोटीवर उतरत नसल्याने त्यांना हि माहिती देय होणार नाही तथाापि मुद्दा क्रमांक १, ४, ५, ७, ८ बाबत व्यापक जनहिताचे निकष लागू होत असल्याने ही माहिती देय होते असे आयोगाचे मत आहे. सेवा पुस्तकाच्या प्रथम पानावर नमूद असलेल्या वैयक्तीक गोष्टी जसे जन्म खुणा, मूळ वास्तव्याचा पुरावा, टी. सी. इत्यादी बाबतची माहिती कलम ८ (१) मध्ये निर्देशित केल्याप्रमाणे देय होत नाही, परंतु उर्वरित माहिती ही जनहितामध्ये येत असल्याने ही माहिती कलम १० नुसार देय होत आहे.

६.५. त्रयस्थाने त्यांच्या जिवितास धोका निर्माण होईल ही जी भूमिका घेतली आहे व त्यांच्या वकिलाने युक्तिवाद केला आहे त्यावर माहिती देणे रोखता येईल किंवा कसे.

माहिती दिल्याने त्रयस्थाच्या शारीरिक सुरक्षतेस धोका उत्पन्न होऊ शकतो अशा फक्त शंकेवर (Apprehension) माहिती देणे रोखून धरता येत नाही असे आयोगाचे मत आहे. अत: कलम ८ (१) (छ) येथे लागू होत नाही.

६.६) अपिलार्थी हे बहुजन क्रांतीदलाचे संघटक आहेत म्हणून त्यांनी केलेला अर्ज नाकारण्यात येऊ शकतो का?

अर्जदार त्यांच्या संघटनेचे काही काम करत असतील व या अर्जाकरीता त्यांनी लेटरहेडचा वापर केला असेल तर त्यांनी संस्थेतर्फे माहिती मागितली आहे हे असे सिध्द होणे कठीण आहे. तसेच अपिलार्थी हे जरी एखाद्या संघटनेचे सदस्य असले तरी त्यांचे नागरिकत्व आबाधित राहते म्हणून त्यांना ही माहिती देय होत आहे.

७)	वरील सर्व बाबींचा साकल्याने विचार करता, मूळ अपिलार्थिने मागितलेल्या माहिती अर्जातील काही मुद्दे वगळता इतर मुद्यांना माहिती अधिकार अधिनियमातील कलम ८ (१) (ज्ञ) मधील तरतुदी लागू होत नाहीत. त्याचप्रमाणे केवळ शंका ही माहिती न देण्यास पुरेशी ठरु शकणार नाही या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे. माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार माहिती ज्या स्वरूपात उपलब्ध आहे त्या स्वरूपात ती देणे आवश्यक आहे. माहिती तयार करुन देणे अभिप्रेत नाही. त्यामुळे अर्जदाराने विचारलेल्या माहितीपैकी जी माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपलब्ध आहे. ती माहिती जन माहिती अधिकारी तथा उपसंचालक, नगररचना कार्यालय,औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांना मूळ अर्जदारास द्यावी लागेल व तसेच जी माहिती त्यांच्या कार्यालयात उपलब्ध नाही त्याबाबत स्पष्टपणे मूळ अर्जदारास कळवावे लागेल.

८)	मूळ अपिलार्थी श्री. सुनिल मनोरे यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास विनंती केली की, त्यांनी दिनांक २९-१०-२००९ रोजीच्या माहिती अर्जान्वये मागितलेल्या माहितीपैकी परिच्छेद ५ मध्ये नमूद केलेल्या माहितीच्या झेरॉक्स प्रती देण्यात याव्यात. या चार मुद्दयापैकी मुद्दा क्रमांक २ ची मागणी त्यांच्या मूळ अर्जामध्ये दिसून येत नाही, म्हणून त्यांना मुद्दा क्रमांक ५, ७ व ८ ची माहिती देण्यात यावी, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन माहिती अधिकारी तथा नगर रचनाकार, उपसंचालक, नगररचना कार्यालय, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांनी वर नमूद केल्याप्रमाणे (मूळ अर्जदार) श्री. सुनिल साहेबराव मनोरे यांना मुद्दा क्रमांक ५, ७ व ८ बाबतची माहिती आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक	११-१०-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१.	श्री. सुनिल साहेबराव मनोरे, रा. सिध्दार्थ बिल्डींग, भिमनगर, भावसिंगपुरा, औरंगाबाद.

२.	श्री. सु. उ. मापारी, १२४, श्रीकृष्णनगर, शहानुरवाडी, औरंगाबाद.

३. जन माहिती अधिकारी तथा नगर रचनाकार, उपसंचालक, नगररचना कार्यालय, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जन अपिलीय अधिकारी तथा उपसंचालक, नगर रचना, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. शेख इकबाल शेख हबीब,<br>सादत नगर, गल्ली नं. ६, पैठण रोड, औरंगाबाद | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>अन्नधान्य वितरण अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>जिल्हा पुरवठा अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/३७६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ११-१०-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. शेख इकबाल शेख हबीब | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>अन्नधान्य वितरण अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद | | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>जिल्हा पुरवठा अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद | | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १६-११-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ११-०१-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |

८	राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख	दि. २६-०२-२०१०

या प्रकरणाची सुनावणी यापूर्वी दिनांक २१-०४-२०११ रोजी घेण्यात आली होती. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित होते. दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यासाठी त्यावेळी प्रकरणाची सुनावणी पुढे ढकलण्यात येऊन ती आज रोजी ठेवण्यात आली होती.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. तथापि राज्य सरकारी कर्मचा-यांच्या राज्य संपामुळे अन्नधान्य वितरण अधिकारी कार्यालयातील संबंधित कर्मचारी संपावर गेले असून सदरील प्रकरणातील संचिका त्यांच्या ताब्यात असल्यामुळे प्रकरणात मूळ संचिका उपलब्ध नसल्यामुळे आज रोजी सुनावणीस उपस्थित राहता येत नाही तरी कृपया पुढील तारीख देण्यात यावी अशी विनंती अन्नधान्य वितरण अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद यांनी आयोगास केली आहे. त्यांची विनंती मान्य करण्यात येऊन सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. सुनावणीची पुढील तारीख यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी व्यक्तिशः उपस्थित राहणे आवश्यक राहील.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## अंतरिम आदेश

या व्दितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. सुनावणीची पुढील तारीख यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व वस्तुनिष्ठ माहितीनिशी व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ११-१०-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. शेख इकबाल शेख हबीब, सादत नगर, गल्ली नं. ६, पैठण रोड, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा अन्नधान्य वितरण अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय,

औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा पुरवठा अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. शेख इलियास, : अपीलकर्ता
माहिती सेवा समिती, दक्षता अधिकारी, छावणी कँन्टोनमेंट,
औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा :
जिल्हा पुरवठा अधिकारी, औरंगाबाद

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/३७७ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ११-१०-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा पुरवठा अधिकारी, औरंगाबाद | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. ११-११-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २२-१२-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०३-०२-२०१० |

या प्रकरणाची सुनावणी यापूर्वी दिनांक २१-०४-२०११ रोजी घेण्यात आली होती. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित होते.

दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यासाठी त्यावेळी प्रकरणाची सुनावणी पुढे ढकलण्यात येऊन ती आज रोजी ठेवण्यात आली होती.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी सर्वजण अनुपस्थित आहेत. प्रकरणात सद्यस्थिती आयोगास अवगत होऊ शकत नाही. प्रकरणात दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटते. यास्तव सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. सुनावणीची पुढील तारीख यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी व्यक्तिशः उपस्थित राहणे आवश्यक राहील.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**अंतरिम आदेश**

या व्दितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. सुनावणीची पुढील तारीख यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व वस्तुनिष्ठ माहितीनिशी व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ११-१०-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. शेख इलियास, माहिती सेवा समिती, दक्षता अधिकारी, छावणी कँन्टोनमेंट, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा पुरवठा अधिकारी, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. अविनाश आर. देशपांडे, : अपिलार्थी
मानवी मेडिकोडेंटल सेंटर, प्लॉट नं. १, इंदुगंगा आर्केड,
सिडको कम्युनिटी सेंटरच्या बाजूला, सिडको, एन-२,
औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी, :
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, औरंगाबाद

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/३८६ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ११-१०-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. अविनाश आर. देशपांडे | : उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, औरंगाबाद | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, औरंगाबाद | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०४-११-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ११-११-२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. २३-११-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २१-१२-२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २६-०२-२०१० |

या प्रकरणाची सुनावणी यापूर्वी दिनांक २१-०४-२०११ रोजी घेण्यात आली होती. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित होते. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित होते. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेण्यासाठी त्यावेळी प्रकरणाची सुनावणी पुढे ढकलण्यात येऊन ती आज रोजी ठेवण्यात आली होती.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढे उपलब्ध असलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी त्यांच्या दिनांक ०४-११-२००९ च्या माहिती अर्जान्वये सरळ परंतु महत्वाची माहिती विचारली आहे. ती व्यापक जनहिताशी संबंधित आहे. विचारलेलेली माहिती खालीलप्रमाणे आहे.

१. कॅन्सर पेशंटची तपासणी करुन केमोथेरपी देण्याकरिता आवश्यक असलेल्या वैद्यकीय शिक्षणाच्या पात्रतेचा तपशील.

२. MBBS डॉक्टर कर्क रुग्णांना उपचार करु शकतो का, करु शकत असल्यास त्याबाबतच्या नियमावलीची प्रत व नसल्यास त्याबाबतचा निर्णय, कायदा इत्यादीच्या प्रती.

ही बाब कर्क रुग्णाशी संबंधित असल्याने तसेच हि बाब व्यापक जनहिताशी संबंधित असल्याकारणाने जन माहिती अधिकारी तसेच जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांची बाजू आयोगापुढे मांडणे आवश्यक होते तथापि ते अनुपस्थित आहे ही गंभीर बाब आहे. याची दखल आयोगाने घेतली आहे. याकरिता सुनावणी पुन्हा पुढे ढकलण्यात येत आहे. सुनावणीची पुढील तारीख यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी व्यक्तिशः उपस्थित राहणे आवश्यक राहील. त्याचप्राणे आयोगास असलेल्या अधिकारान्वये संचालक, आरोग्य सेवा, आरोग्यभवन, सेंट जॉर्ज हॉस्पिटल आवार, मुंबई - ४०० ००१ यांची विशेष साक्ष या प्रकरणात घेण्यात येईल व त्यांना साक्षीसाठी उपस्थित राहावे लागेल.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## अंतरिम आदेश

१. या व्दितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. सुनावणीची पुढील तारीख यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व वस्तुनिष्ठ माहितीनिशी व्यक्तिशः उपस्थित राहावे.

२. संचालक, आरोग्य सेवा यांची या प्रकरणात विशेष साक्ष लावण्यात आली आहे पुढील सुनावणीस त्यांनी लेखी निवेदन आयोगास सादर करणे आवश्यक आहे व व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ११-१०-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. अविनाश आर. देशपांडे, मानवी मेडिकोडेंटल सेंटर, प्लॉट नं. १, इंदुगंगा आर्केड, सिडको कम्युनिटी सेंटरच्या बाजूला, सिडको, एन-२, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. संचालक, आरोग्य सेवा, आरोग्यभवन, सेंट जॉर्ज हॉस्पिटल आवार, मुंबई - ४०० ००१ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. सचिव, सार्वजनिक आरोग्य सेवा, मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्रीमती प. गं. कोदरकर,<br>व्दारा, श्री. अकोलकर,<br>३३८ (अ), रेणुका, छत्रपतीनगर, गारखेडा परिसर,<br>औरंगाबाद | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>तहसीलदार (सर्वसाधारण), जिल्हाधिकारी कार्यालय (स्वा. सै. कक्ष), बीड | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय (स्वा. सै. कक्ष), बीड | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/३९८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ११-१०-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>तहसीलदार (सर्वसाधारण), जिल्हाधिकारी कार्यालय (स्वा. सै. कक्ष), बीड - श्री. एम. जी. राठोड | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>निवासी उपजिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, बीड - श्री. बी. एम. कांबळे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०१-०९-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ३०-१०-२००९ |

७ अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख --

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. २५-०२-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांना मे २००९ मध्ये जिल्हाधिकारी कार्यालयातील स्वातंत्र्य सैनिक कक्षाकडून त्यांच्या दूरध्वनीवर विचारणा करण्याकरिता फोन आला होता. तो फोन त्यांनी कोणत्या पत्राच्या आधारे केला त्याची प्रत व त्या पत्रानुसार जिल्हाधिकारी कार्यालय (स्वातंत्र्य सैनिक कक्ष) यांनी पाठविलेल्या माहितीची प्रत मागितली आहे. अर्ज मोघम स्वरुपाचा आहे. अशा प्रकारे स्वातंत्र्य सैनिक कक्षाकडून त्यांच्या दूरध्वनी क्रमांकावर कोणी फोन केला हे चौकशी करुनही ज्ञात होत नाही. त्यामुळे नेमकी माहिती कोणती द्यावी त्याचा बोध होत नाही, त्यामुळे माहिती देता आली नाही.

या प्रकरणाची सुनावणी यापूर्वी दिनांक २६-०४-२०११ रोजी झाली होती त्यावेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी अनुपस्थित होते. दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेणे आवश्यक वाटत असल्याने सुनावणी पुढे ढकलण्यात आली होती. आज रोजी अपिलार्थी पुनश्च अनुपस्थित आहेत. याकरिता आयोगापुढे केलेला युक्तिवाद विचारात घेता अपिलार्थी यांनी त्यांच्याकडे मागितलेल्या माहितीबाबत काही संदर्भ उपलब्ध असल्यास त्यांनी पंधरा दिवसाच्या आज जन माहिती अधिकारी यांना कळवावे व त्यानंतर पुढील पंधरा दिवसाच्या आत कार्यालयात माहिती उपलब्ध असल्यास अपिलार्थीस देण्यात यावी. अपिलार्थी जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः संपर्क ही साधू शकतात त्यामुळे प्रकरण लवकर निकाली काढणे शक्य होईल.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने वर नमूद केल्याप्रमाणे पंधरा दिवसाच्या आत कळविल्यास किंवा संपर्क साधल्यास त्यांच्या कार्यालयात मूळ अर्जाच्या संदर्भात उपलब्ध असलेली माहिती अपिलार्थीस देण्याची व्यवस्था करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ११-१०-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्रीमती प. गं. कोदरकर, व्दारा, श्री. अकोलकर, ३३८ (अ), रेणुका, छत्रपतीनगर, गारखेडा परिसर, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार (सर्वसाधारण), जिल्हाधिकारी कार्यालय (स्वा. सै. कक्ष), बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. रघुनाथ सरदार चव्हाण, : अपीलकर्ता
व्दारा तालुका निरीक्षक भूमि अभिलेख कार्यालय,
खुलताबाद, तालुका खुलताबाद, जिल्हा औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
वरिष्ठ लिपिक, अधीक्षक भूमि अभिलेख कार्यालय, जालना
जन अपिलीय अधिकारी तथा :
अधीक्षक भूमि अभिलेख, जालना

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/४११ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ११-१०-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. रघुनाथ सरदार चव्हाण | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>वरिष्ठ लिपिक, अधीक्षक भूमि अभिलेख कार्यालय, जालना<br>- श्री. दि. व. भाले | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख, जालना | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १४-१०-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २१-११-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २२-१२-२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २०-०३-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जान्वये दोन मुद्दयावर माहिती मागितली आहे. त्यांच्या माहितीच्या अर्जातील मुद्दा क्रमांक दोनची माहिती त्यांना प्राप्त झाली आहे. मुद्दा क्रमांक एक मधील माहिती त्यांना प्राप्त झालेली नाही. जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात असलेली संचिका शोध घेऊनही प्राप्त झाली नाही. तथापि जमाबंदी आयुक्त यांनी जिल्हाधिकारी यांना दिनांक १४-०२-१९७२ च्या पत्रान्वये कळविले आहे की, जिल्हाधिकारी यांना प्राप्त झालेली शक्ती त्यांनी त्यांच्या जिल्ह्यातील जिल्हा अधीक्षक, भूमि अभिलेख यांना प्रदान करावी व अधिसूचना सोबत जोडली आहे. त्याची एक प्रत आयोगाच्या निदेशानुसार अपिलार्थीस देण्यात आली. अपिलार्थीने ती स्विकारली. अपिलार्थी यांना या पत्राचे आधारे जिल्हाधिकारी कार्यालयाकडून नव्याने अर्ज करुन ही माहिती प्राप्त करुन घ्यावी लागेल, अपिलार्थीने ते मान्य केले.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ११-१०-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. रघुनाथ सरदार चव्हाण, व्दारा तालुका निरीक्षक भूमि अभिलेख कार्यालय, खुलताबाद, तालुका खुलताबाद, जिल्हा औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ लिपिक, अधीक्षक भूमि अभिलेख कार्यालय, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक भूमि अभिलेख, जालना यांना या

निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. पठाण रहेमतउल्ला समीउल्ला, : अपीलकर्ता
पांडुरंग ऑईल मिल समोर, गोकुंदा, तालुका किनवट,
जिल्हा नांदेड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
कक्ष अधिकारी, अल्पसंख्याक विकास विभाग, महाराष्ट्र
शासन, मंत्रालय, मुंबई - ३२
जन अपिलीय अधिकारी तथा :
अवर सचिव, अल्पसंख्याक विकास विभाग, मंत्रालय,
मुंबई - ३२

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/६८३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ११-१०-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>कक्ष अधिकारी, अल्पसंख्याक विकास विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई - ३२ | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अवर सचिव, अल्पसंख्याक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२ | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १८-०१-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०८-०२-२०१० |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०८-०३-२०१० |

७ अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख दि. ०५-०४-२०१०

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. १७-०५-२०१०

या प्रकरणाची सुनावणी यापूर्वी दिनांक १८-०५-२०११ रोजी घेण्यात आली होती. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी अनुपस्थित होते. जन अपिलीय अधिकारी उपस्थित होते. दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यासाठी त्यावेळी प्रकरणाची सुनावणी पुढे ढकलण्यात येऊन ती आज रोजी ठेवण्यात आली होती.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी सर्वजण अनुपस्थित आहेत. प्रकरणात सद्यस्थिती आयोगास अवगत होऊ शकत नाही. प्रकरणात दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटते. यास्तव सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. सुनावणीची पुढील तारीख यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी व्यक्तिशः उपस्थित राहणे आवश्यक राहील.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## अंतरिम आदेश

या व्दितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. सुनावणीची पुढील तारीख यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व वस्तुनिष्ठ माहितीनिशी व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ११-१०-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. पठाण रहेमतउल्ला समीउल्ला, पांडुरंग ऑईल मिल समोर, गोकुंदा, तालुका किनवट, जिल्हा नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, अल्पसंख्याक विकास विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील

कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अवर सचिव, अल्पसंख्याक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. रविंद्र बळीराम मोरे, : अपिलार्थी
रा. साळेगांव, पो. सांडस, तालुका कळमनुरी,
जिल्हा हिंगोली

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, कळमनुरी,
जिल्हा हिंगोली

जन अपिलीय अधिकारी तथा :
तहसीलदार, तहसील कार्यालय, कळमनुरी, जिल्हा हिंगोली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/८०१ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ११-१०-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, कळमनुरी,<br>जिल्हा हिंगोली | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, कळमनुरी, जिल्हा हिंगोली | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. २२-११-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २१-१२-२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ३१-१२-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २२-०३-२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिति अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिति अर्जान्वये सन २००९-१० या कालावधीची जिल्हा परिषद सर्कल नांदापूर, तालुका कळमनुरी, जिल्हा हिंगोली अंतर्गत तलाठी सजा मार्फत एकूण पाच योजनांच्या बाबत विविध मुद्दयावर विस्तृत अशी माहिती दिनांक २२-११-२०१० च्या पत्रान्वये मागितली आहे. सदरची माहिती त्यांना प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, कळमनुरी, जिल्हा हिंगोली यांनी दिनांक २१-१२-२०१० च्या पत्रान्वये नांदापूर सर्कल मधील विचारलेल्या माहितीची एकूण ५० पृष्ठे होतात व त्यांच्या झेरॉक्स प्रती करण्यासाठी रुपये १०० इतका खर्च अपेक्षित आहे त्याचा भरणा बॅकेत करावा नंतर माहिती पुरविण्यात येईल तसेच अपिलार्थी दारिद्र्यरेषेखालील आहेत. त्यामुळे त्यांनी डीआरडीए चे प्रमाणपत्र जोडावे म्हणजे निधी उपलब्ध होताच माहिती देता येईल असे कळविले आहे. अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती विस्तृत स्वरुपाची आहे. वरील बाबी विचारात घेता जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस त्यांनी मागितलेली संपूर्ण माहिती, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) च्या तरतुदीन्वये त्यांच्या कार्यालयात पाहणीसाठी एक दिवस सुनिश्चित करुन अपिलार्थीस नोंदणीकृत पत्राने कळवून उपलब्ध करुन द्यावी लागेल व पाहणीनंतर त्यातील काही कागदपत्रांची अपिलार्थीस आवश्यकता असल्यास त्याच्या झेरॉक्स प्रती त्यांना विनामूल्य उपलब्ध करुन द्याव्या लागतील.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागितलेल्या माहिती-संदर्भातील सर्व अभिलेखे त्यांच्या कार्यालयात पहाणीसाठी एक दिवस (वेळ सकाळी ११-०० ते सायं. ०५-००) सुनिश्चित करुन उपलब्ध करुन द्यावेत व या पहाणीनंतर अपिलार्थीस काही आवश्यक असलेली कागदपत्रे छायांकीत करुन देण्याची व्यवस्था करावी. ही प्रक्रिया जन माहिती अधिकारी यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ११-१०-२०११** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. रविंद्र बळीराम मोरे, रा. साळेगांव, पो. सांडस, तालुका कळमनुरी, जिल्हा हिंगोली.

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, कळमनुरी, जिल्हा हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, कळमनुरी, जिल्हा हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. उत्तम दगडूजी बगाटे,रा.हिंगोली : अपिलार्थी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी,
तहसील कार्यालय,हिंगोली. : उत्तरवादी

जन अपिलीय अधिकारी तथा
तहसीलदार, हिंगोली. :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/२९२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ११-१०-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - नायब तहसीलदार(पुरवठा), तहसील कार्यालय,हिंगोली - श्री. व्ही. एन.आकुलवार | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - तहसीलदार, हिंगोली | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०३.०८.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १८.०९.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ३०.१२.२०१० |

या प्रकरणाची सुनावणी यापूर्वी दि. ०३.०३.२०११ रोजी आयोगापुढे ठेवण्यात आली होती. त्यावेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यापैकी कोणीही उपस्थित नव्हते. दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेणे आवश्यक ठरत असल्याने सुनावणी पुढे ढकलण्यात आली होती. तदनंतर प्रकरणात आज सुनावणी घेण्यात येत आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी दि. ०३.०८.२०१० रोजीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जान्वये केरोसीन वितरणासंदर्भात तीन मुद्यांवर माहिती मागितली आहे. यासंदर्भात दि. १९.०९.२०१० रोजी अपिलार्थीस मुद्दा क्र. १ ची माहिती देण्यात आली आहे. अपिलार्थीस माहिती मिळाल्याबाबतची पोच त्यांच्या अभिलेखात उपलब्ध आहे. उर्वरित मुद्दा क्र. २ व ३ ची माहिती त्यांच्या कार्यालयात उपलब्ध नसून पुरवठा कार्यालय जिल्हाधिकारी कार्यालयाकडे उपलब्ध आहे. तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी मुद्दा क्र. २ व ३ च्या माहितीसाठी अपिलार्थी यांचा मूळ अर्ज अधिनियमातील कलम ६(३)(एक) नुसार संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडे वर्ग करणे आवश्यक होते. तथापि तसे केल्याचे दिसून येत नाही. भविष्यात त्यांना याबाबीची दक्षता घ्यावी लागेल. मुद्दा क्र. २ व ३ संदर्भातील माहितीसाठी जिल्हा पुरवठा अधिकारी, हिंगोली यांना जन माहिती अधिकारी म्हणून आयोगातर्फे निश्चित करण्यात येत आहे. त्यांच्याकडे अपिलार्थीच्या मूळ माहितीसाठीच्या अर्जाची प्रत पाठविण्यात येत आहे. त्यांना या मुद्यांवरील माहिती अपिलार्थीस वर नमूद केल्याप्रमाणे नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी लागेल.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

जिल्हा पुरवठा अधिकारी, हिंगोली यांनी अपिलार्थीस मुद्दा क्र.२ व ३ च्या संदर्भातील माहिती आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ११-१०-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. उत्तम दगडूजी बगाटे, सिध्दार्थनगर,दुध डेअरीसमोर, हिंगोली,ता.जि.हिंगोली

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय,हिंगोली

यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जिल्हा पुरवठा अधिकारी, हिंगोली यांना (अपिलार्थीच्या माहिती अर्जाच्या प्रतीसह) या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. अशोक शिवराम रहाटवाड, : अपिलार्थी
रा. मांगेगाव, पो. तळपिंप्री, तालुका गंगापूर,
जिल्हा औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
विशेष भूमी संपादन अधिकारी, जायकवाडी प्रकल्प,
औरंगाबाद कार्यालय, औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी तथा :
अतिरिक्त जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय,
औरंगाबाद

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/३७३ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ११-१०-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा विशेष भूमी संपादन अधिकारी, जायकवाडी प्रकल्प, औरंगाबाद कार्यालय, औरंगाबाद | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०७-०९-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०७-१२-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ३१-१२-२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०२-०२-२०१० |

यापूर्वी या प्रकरणात दि. २१.०४.२०११ रोजी सुनावणी घेण्यात आली. त्यावेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी सर्वजण अनुपस्थित होते. प्रकरणात दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटल्यामुळे अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांना पुढील सुनावणीस व्यक्तिशः उपस्थित राहण्याच्या सूचना देण्यात येऊन सुनावणी पुढे ढकलण्यात आली होती. प्रकरणात आज दि. ११.१०.२०११ रोजी सुनावणी घेण्यात येत आहे. आज रोजी सुध्दा अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी स्वतः अथवा त्यांचे प्रतिनिधी यांपैकी कोणीही उपस्थित नाही.

आयोगास सादर करण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की,जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील कलम ७(१)नुसार मुदतीत अपिलार्थीस दि. १०.०९.२००९ रोजीच्या पत्राद्वारे संचिकेचे अवलोकन करुन माहिती घेऊन जाण्यास कळविण्यात आले होते. तथापि अपिलार्थी यांनी प्रतिसाद दिल्याचे दिसून येत नाही. अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर दिलेल्या निर्णयाद्वारे जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी यांनी अपिलार्थीस पंधरा दिवसांच्या आत माहिती देण्यात यावी, असे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले आहे. त्यानुसार दि. १७.०१.२०१० रोजी अपिलार्थीस माहिती देण्यात आली आहे. तसेच दि. १८.०१.२०१० रोजी भूसंपादन प्रमाणपत्र सेतू सुविधा केंद्रामार्फत अपिलार्थीस देण्यात आले आहे. यावरुन अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती त्यांना प्राप्त झाली आहे, असे दिसून येत आहे.

या सर्व बाबी विचारात घेता आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ११-१०-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. अशोक शिवराम रहाटवाड, रा. मांगेगाव, पो. तळपिंप्री, तालुका गंगापूर, जिल्हा औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा विशेष भूसंपादन अधिकारी, जायकवाडी प्रकल्प, औरंगाबाद कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. लहुजी भाऊराव हिवाळे, : अपिलार्थी
रा.गुळनिंब, ता.गंगापूर, जि.औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
तहसीलदार,
स्वस्त धान्य पुरवठा विभाग,तहसील कार्यालय,गंगापूर,
जि.औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा :
उपविभागीय अधिकारी,
पुरवठा विभाग,उपविभागीय अधिकारी कार्यालय,वैजापूर,
जि.औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/४०७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ११-१०-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०५.११.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २२.१२.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ११.०३.२०१० |

या प्रकरणाची सुनावणी यापूर्वी दि. २६.०४.२०११ रोजी घेण्यात आली होती. त्यावेळी वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी स्वत: अथवा त्यांचे प्रतिनिधी यापैकी कोणीही

उपस्थित नव्हते. त्यामुळे पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी सर्व माहितीनिशी व्यक्तिशः उपस्थित राहावे अशा सूचना देण्यात येऊन सुनावणी पुढे ढकलण्यात आली होती.आज पुन्हा सुनावणी घेण्यात येत आहे. आज देखील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी स्वत: अथवा त्यांचे प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नाही. त्यामुळे आयोगास सद्यस्थिती अवगत होऊ शकत नाही. अपिलार्थी यांनी स्वस्तधान्य दुकान क्र. १९/२० व इतर स्वस्तधान्य व घाऊक केरोसीन विकेत्यांबाबत विविध मुद्यांवर माहिती मागितलेली आहे. उपलब्ध कागदपत्रांवरुन अपिलार्थीस माहिती दिली किंवा कसे याचा बोध होत नाही. तरी माहिती दिली नसल्यास जन माहिती अधिकारी यांना माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७(९) नुसार एक दिवस (वेळ सकाळी ११.०० ते सायं.०५.००) निश्चित करुन अपिलार्थीने मागितलेल्या माहितीशी संबंधित अभिलेखे पाहणीसाठी अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावे लागतील व त्यातून अपिलार्थीस आवश्यक असलेल्या काही कागदपत्रांच्या छायाप्रती विनामूल्य द्याव्या लागतील. अपिलार्थीस याबाबत नोंदणीकृत टपालाद्वारे सूचित करावे लागेल.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी एक दिवस निश्चित (वेळ सकाळी ११.०० ते सायं.०५.००) करुन अपिलार्थीने मागितलेल्या माहितीशी संबंधित अभिलेखे पाहणीसाठी अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावीत व त्यातून अपिलार्थीस आवश्यक असलेल्या काही कागदपत्रांच्या छायाप्रती विनामूल्य द्याव्यात. ही कार्यवाही हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत पूर्ण करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ११-१०-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. लहुजी भाऊराव हिवाळे,रा.गुळनिंब, ता.गंगापूर, जि.औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार गंगापूर, जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, वैजापूर,जि.औरंगाबाद यांना या

निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. सुग्रीव सोपानराव मुंडे,<br>रा.औरंगाबाद. | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता,<br>जायकवाडी पाटबंधारे विभाग,नाथनगर (उ),पैठण,जि.औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता,<br>जायकवाडी पाटबंधारे विभाग,नाथनगर (उ),पैठण,जि.औरंगाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/४२२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ११-१०-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - लेखापाल, जायकवाडी पाटबंधारे विभाग, नाथनगर (उत्तर),पैठण, जि.औरंगाबाद - श्री. आर.पी.रथ | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - उपकार्यकारी अभियंता, जायकवाडी पाटबंधारे विभाग,नाथनगर (उत्तर), पैठण, जि.औरंगाबाद - श्री. के.एस.शिंदे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २९.१२.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०१.०२.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. १९.०३.२०१०

यापूर्वी या प्रकरणात दि. २७.०४.२०११ रोजी सुनावणी घेण्यात आली त्यावेळी जन अपिलीय अधिकारी, जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित होते. अपिलार्थी अनुपस्थित होते. त्यामुळे अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांची बाजू ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटल्यामुळे सदर प्रकरणाची सुनावणी पुढे ढकलण्यात येऊन अपिलार्थी तसेच जन माहिती अधिकारी,श्री. एस.डी.दौंड यांच्यासह सर्व संबंधितांना पुढील सुनावणीच्यावेळी आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहण्याबाबत सूचित करण्यात आले होते.प्रकरणात आज दि. ११.१०.२०११ रोजी पुन्हा सुनावणी घेण्यात येत आहे. सुनावणीस अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन अपिलीय अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी दि. २९.१२.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये पैठण डावा कालव्यावरील जलसेतू-१ ते १९ नं.पर्यंत झालेल्या कामाबाबत सन २००७ ते ०८ या कालावधीची एकूण ७ मुद्यांवर माहिती मागितली आहे. ही माहिती देण्याकरिता ₹१३०/- शुल्काचा भरणा करावा,असे अपिलार्थीस विहित मुदतीत दि. २९.०१.२०१० रोजीच्या पत्राद्वारे कळविण्यात आले आहे. त्यास अपिलार्थी यांनी प्रतिसाद दिलेला नाही. त्यानंतर अपिलार्थीस दि. ०८.०२.२०१० रोजी स्मरणपत्र देण्यात आले आहे. तसेच भ्रमणध्वनीद्वारे सुध्दा अपिलार्थीस कळविण्यात आले आहे. अपिलार्थी यांनी आजपर्यंत शुल्काचा भरणा केलेला नाही. त्यामुळे त्यांना माहिती देता येत नाही.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रांवरुन वरील बाबी दिसून येत आहेत. तरी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे पंधरा दिवसांच्या आत शुल्काचा भरणा करावा व जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीने माहितीसाठीच्या शुल्काचा भरणा केल्यास पुढील पंधरा दिवसांच्या आत अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागितलेली माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे द्यावी लागेल.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

जन माहिती अधिकारी तथा लेखापाल, जायकवाडी पाटबंधारे विभाग,नाथनगर(उ) पैठण, जि.औरंगाबाद यांनी अपिलार्थीने वर नमूद केल्याप्रमाणे शुल्काचा भरणा केल्यास पुढील पंधरा दिवसांच्या आत देय असलेली माहिती अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाद्वारे पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ११-१०-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सुग्रीव सोपानराव मुंडे,पी-४/४/६,विठ्ठलनगर, रामनगर,एन-२,सिडको,औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा लेखापाल, जायकवाडी पाटबंधारे विभाग, नाथनगर (उत्तर),पैठण जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता, जायकवाडी पाटबंधारे विभाग,नाथनगर (उत्तर), पैठण, जि.औरंगाबाद या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. शरद बा. कुलकर्णी, : अपिलार्थी
रा.औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, कोल्हापूर
विभाग,कोल्हापूर
जन अपिलीय अधिकारी तथा :
विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, कोल्हापूर
विभाग,कोल्हापूर

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/४२४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ११-१०-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - विभागीय सहसंचालक (उ.शि.) कोल्हापूर विभाग, कोल्हापूर- डॉ. बी.बी.कदम | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०९.११.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २४.१२.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २३.०३.२०१० |

या प्रकरणाची सुनावणी यापूर्वी दि. २७.०४.२०११ रोजी आयोगापुढे ठेवण्यात आली होती. त्यावेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यापैकी कोणीही उपस्थित नव्हते. दोनही

बाजूंचे म्हणणे ऐकून घेणे आवश्यक ठरत असल्याने सुनावणी पुढे ढकलण्यात आली होती. प्रकरणात आज सुनावणी घेण्यात येत आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व संबंधित जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, दयानंद महाविद्यालय, सोलापूर अनुपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय सहसंचालक (उच्च शिक्षण), कोल्हापूर विभाग,कोल्हापूर यांनी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांची सन १९९९ साली सेवानिवृत्ती झालेली आहे. सेवानिवृत्तीच्या वेळी ते दयानंद महाविद्यालय,सोलापूर येथे कार्यरत होते. त्यांनी सेवेत असताना पी.एचडी. पदवी प्राप्त केली, त्यानुसार त्यांना तीन वेतनवाढी अनुज्ञेय होतात. त्याबाबतचा प्रस्ताव विचाराधीन होता. तथापि अपिलार्थी यांची सेवापुस्तिका प्राप्त न झाल्यामुळे त्यांच्या महाविद्यालयातून आलेल्या प्रस्तावाची छाननी करणे शक्य होत नव्हते. दयानंद महाविद्यालय,सोलापूरच्या पूर्वी ते बार्शी येथील श्री शिवाजी महाविद्यालयात कार्यरत होते. दोनही ठिकाणी शोध घेतल्यानंतर त्यांची सेवापुस्तिका बार्शी येथील महाविद्यालयात आढळून आली. तदनंतर त्यांचा सदरचा प्रस्ताव शासनाकडून मान्यता घेऊन दयानंद महाविद्यालय,सोलापूर यांना कळविण्यात आले आहे. त्यामुळे याबाबतची माहिती दयानंद महाविद्यालय,सोलापूर यांच्याकडून मिळणे अपेक्षित आहे. तथापि तसे केले नसल्याने कळविण्याची व्यवस्था करण्यात येईल, असेही त्यांनी आयोगास अवगत केले. जन अपिलीय अधिकारी यांनी पुढे असेही अवगत केले की, निधीची उपलब्धता होताच ₹१,९३,७७८/- इतकी रक्कम अपिलार्थीस देय होऊ शकेल.

आज अपिलार्थी अनुपस्थित आहेत. तथापि अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जामध्ये नमूद केलेल्या माहितीच्या संदर्भात आज रोजी अपिलार्थीस सुनावणीच्या वेळी युक्तिवादाद्वारे सादर करण्यात आलेल्या माहितीमुळे त्यांना अपेक्षित माहिती प्राप्त होत आहे, असे दिसून येत आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय सहसंचालक (उच्च शिक्षण), कोल्हापूर विभाग,कोल्हापूर यांनी संबंधित जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, दयानंद महाविद्यालय,सोलापूर हे वर नमूद केल्याप्रमाणे प्रकरणाची सद्यपरिस्थिती दर्शविणारी कागदपत्रे अपिलार्थीस हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवतील, अशी व्यवस्था करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ११-१०-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. डॉ. शरद बा. कुलकर्णी,१६७,"बलवंत", ज्योतीनगर,ज्योती मंदिराजवळ,औरंगाबाद - ४३१ ००५.

२. जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, दयानंद महाविद्यालय,सोलापूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय सहसंचालक (उच्च शिक्षण), कोल्हापूर विभाग,कोल्हापूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री.शामराव सुंदरराव खरात,रा.पाथरवाला : अपिलार्थी
बु.ता.अंबड,जि.जालना.

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
कक्ष अधिकारी,जलसंपदा व लाभक्षेत्र विकास
विभाग,मंत्रालय,मुंबई
जन अपिलीय अधिकारी तथा
उपसचिव (आस्थापना),जलसंपदा विभाग,मंत्रालय,मुंबई

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/६८६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. | ११-१०-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री.शामराव सुंदरराव खरात | : | उपस्थित |
| ३.२ | १)जन माहिती अधिकारी - अवर सचिव(दक्षता), जलसंपदा विभाग,मंत्रालय,मुंबई - श्री. ग.शा.सोनवणे | : | उपस्थित |
| | २)जन माहिती अधिकारी - अवर सचिव, जलसंपदा विभाग,मंत्रालय,मुंबई- श्री. प्र.प्र.गोसावी | : | उपस्थित |
| ३.३ | १)जन अपिलीय अधिकारी -उपसचिव (आस्था.),जलसंपदा विभाग,मंत्रालय,मुंबई- श्री. अ. अ.कोदे | : | उपस्थित |
| | २)जन अपिलीय अधिकारी -उपसचिव (प्रशा.),जलसंपदा विभाग,मंत्रालय,मुंबई - श्री. वि.र.दहिफळे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. | २१.०७.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. | ०४.०८.२०१० |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. | १२.०९.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | १२.११.२०१० |

यापूर्वी या प्रकरणात दि. १८-०५-२०११ रोजी सुनावणी घेण्यात आली. त्यावेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित होते. अपिलार्थी अनुपस्थित होते. अपिलार्थी यांनी दि. १२.०५.२०११ रोजीच्या पत्राद्वारे सुनावणी पुढे ढकलण्याची विनंती केल्यामुळे अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांना पुढील सुनावणीस व्यक्तिशः उपस्थित राहण्याच्या सूचना देण्यात येऊन सुनावणी पुढे ढकलण्यात आली होती. प्रकरणात आज दि. ११.१०.२०११ रोजी सुनावणी घेण्यात येत आहे. सुनावणीसाठी अपिलार्थी, संबंधित जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, त्यांनी दि. २१.०७.२०१० रोजीच्या माहिती अर्जान्वये जलसंपदा विभागातील विविध परिमंडळ/विभागामधील भ्रष्टाचाराबाबत एकूण ५ मुद्यांद्वारे माहिती मागितली आहे. माहितीचा कालावधी दि. ०१.०१.२००८ ते २१.०७.२०१० असा आहे. सदरची माहिती दोन विभागाशी संबंधित आहे. कलम ६(३)(एक) नुसार विहित मुदतीत माहितीसाठीचा अर्ज हस्तांतरित करण्यात आला नाही. त्यामुळे शुल्काचा भरणा करावा असे ७० दिवस विलंबाने दि. २३.०८.२०१० रोजीच्या पत्राद्वारे कळविले. आतापर्यंत त्यांना माहिती मिळालेली नाही.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती एकूण तीन विभागाशी संबंधित आहे. अपिलार्थीचा मूळ अर्ज दि. ३० जुलै, २०१० रोजी मंत्रालयात प्राप्त झाला. जन माहिती अधिकारी यांनी संबंधित इतर दोन कक्षास दि. ०४.०८.२०१० रोजी अपिलार्थीचा अर्ज हस्तांतरित केला. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. ०४.०८.२०१० रोजीच्या पत्राद्वारे असेही कळविले आहे की, त्यांनी मागितलेली माहिती कागदपत्राच्या स्वरुपात ठेवण्यात येत नाही. त्यामुळे अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ३,४ व ५ च्या संदर्भात ही माहिती तयार करुन देण्याची अधिनियमाद्वारे तरतुद नाही. त्यांनी पुढे असेही अवगत केले की, अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी दि. ०७.०१.२०१०, ०१.११.२०१० व १७.०२.२०१० रोजी ठेवण्यात आली. त्याबाबतची पूर्वसूचना अपिलार्थीस देण्यात आली होती. तथापि अपिलार्थी सुनावणीस अनुपस्थित राहिले. सरतेशेवटी उपलब्ध कागदपत्रांवरुन दि. २०.११.२०१० रोजी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी योग्य कळविले आहे, असा निर्णय घेऊन अपील खारीज करण्यात आले आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. २ हा विभागीय चौकशी सुरु असताना अधिकारी/कर्मचाऱ्यांना पदोन्नती दिली असल्यास त्याचा तपशील मागितला आहे. परंतु उपरोक्त कालावधीत अशाप्रकारची चौकशी चालू असताना कोणासही पदोन्नती देण्यात आली नाही, असे अपिलार्थीस दि. २३.०८.२०१० व २१.०९.२०१० रोजी कळविण्यात आले आहे.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रांवरुन आयोग खालील माहिती अपिलार्थीस देण्यात यावी, या निष्कर्षाप्रत येत आहे.

१) मुद्दा क्र. १- दि. ०१.०१.२००८ ते २१.०७.२०१० या कालावधीमध्ये मंत्रालय स्तरावर जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध असलेल्या अधिकाऱ्यांवर सुरु असलेल्या चौकशीबाबतची उपलब्ध यादी

२) मुद्दा क्र.४ : दि. ०१.०१.२००८ ते २१.०७.२०१० या कालावधीमध्ये विधानसभा व विधानपरिषदेमध्ये लोकप्रतिनिधींनी भ्रष्टाचाराच्या अनुषंगाने उपस्थित केलेल्या लक्षवेधी/तारांकित प्रश्न व त्यावर शासनाने दिलेल्या उत्तराची माहिती.

उपरोक्त माहिती जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी लागेल.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव(दक्षता), जलसंपदा विभाग,मंत्रालय,मुंबई यांनी वर नमूद केल्याप्रमाणे देय असलेली माहिती अपिलार्थीस हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ११-१०-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. शामराव सुंदरराव खरात, रा.पाथरवाला (बु.),ता.अंबड,जि.जालना

२. जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव(दक्षता), जलसंपदा विभाग,मंत्रालय,मुंबई यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव, जलसंपदा विभाग,मंत्रालय,मुंबई यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी

४. जन अपिलीय अधिकारी तथा उपसचिव (आस्था.),जलसंपदा विभाग,मंत्रालय,मुंबई यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. जन अपिलीय अधिकारी तथा उपसचिव (प्रशा.),जलसंपदा विभाग,मंत्रालय,मुंबई यांना

या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री.ए.एम.शेख, : अपिलार्थी
रा.औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
अवर सचिव (वि.चौ.),सार्वजनिक बांधकाम विभाग,
मंत्रालय,मुंबई
जन अपिलीय अधिकारी तथा
उपसचिव (सेवा),
सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय,मुंबई

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/८२० | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ११-१०-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - अवर सचिव (वि.चौ.), सार्वजनिक बांधकाम विभाग,मंत्रालय,मुंबई- श्री.दि. वा.दळवी | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी -उपसचिव (सेवा),सार्वजनिक बांधकाम विभाग,मंत्रालय,मुंबई- श्री. वि. वा.बोभाटे | : उपस्थित |
| ३.४ | त्रयस्थ पक्ष - श्री. नागनाथ जळकोटे,मुख्य अभियंता, सा.बां.प्रा.वि.पुणे- प्रतिनिधी -श्री.अभय भगवानराव वकील | : उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १९.११.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २४.१२.२०१० |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. ११.०१.२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २८.०२.२०११ |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. २५.०३.२०११

यापूर्वी या प्रकरणाची सुनावणी दि. १८.०५.२०११ रोजी घेण्यात आली होती. त्यावेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व त्रयस्थ पक्ष यांचे प्रतिनिधी उपस्थित होते. जन माहिती अधिकारी यांनी दि. १३.०५.२०११ रोजीच्या निवेदनाद्वारे राज्य माहिती आयोगास विनंती केली होती की, सुनावणीची पुढील तारीख देण्यात यावी. त्याचप्रमाणे सदर द्वितीय अपील प्रकरणातील त्रयस्थ पक्ष श्री.ना.ह.जळकोटे,मुख्य अभियंता.सा.बां.प्रादेशिक विभाग,पुणे यांनी दि. १६.०५.२०११ रोजीच्या पत्रान्वये खंडपीठाकडील सुनावणीची पुढील तारीख देण्यासाठी विनंती केली होती. त्यामुळे जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांची बाजू तसेच त्रयस्थ पक्षाची बाजू ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटल्यामुळे प्रकरणात अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांना पुढील सुनावणीस सर्व माहितीनिशी व्यक्तिशः उपस्थित राहण्यासंबंधी सूचित करुन सुनावणी पुढे ढकलण्यात आली होती.

आज दि. ११.१०.२०११ रोजी पुन्हा सुनावणी घेण्यात येत आहे. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी, त्रयस्थ पक्षाचे प्रतिनिधी श्री. अभय भगवानराव वकील उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थीने त्यांच्या दि. १९.११.२०१० रोजीच्या माहितीच्या अर्जान्वये त्रयस्थ श्री. नागनाथ जळकुटे, मुख्य अभियंता, सा.बां.विभाग,पुणे यांच्या सेवाकाळातील विविध विषयास अनुसरुन एकूण दहा मुद्यांद्वारे माहिती मागितली आहे. यापैकी मुद्दा क्र.१,२,५,६ व ९ शी संबंधित माहिती त्यांच्याशी संबंधित आहे व उर्वरित मुद्यांशी संबंधित माहिती ही अधीक्षक अभियंता, सा.बां.मंडळ,पुणे, अवर सचिव (इमारती) अवर सचिव(रस्ते), कार्यासन अधिकारी, सेवा-१,२ व ६ सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय,मुंबई यांच्याशी संबंधित असल्याने दि. ३०.११.२०१० रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीच्या अर्जाची प्रत संबंधितांना पाठविण्यात येऊन त्यांच्याशी संबंधित माहिती अपिलार्थीस माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदीनुसार देण्यात यावी असे कळविण्यात आले. दि. २४.१२.२०१० रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस त्यांच्याशी संबंधित मुद्दा क्र. १,२,५,६ व ९ ची माहिती देण्यात आली. या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने दि.११.०१.२०११ रोजी प्रथम अपिलीय प्राधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. या प्रथम अपिलामध्ये अपिलार्थीने त्यांच्या माहितीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. २,५,६ व ९ शी संबंधित माहितीची मागणी कायम ठेवली. या प्रथम अपिलावर निर्णय देताना जन अपिलीय अधिकारी यांनी या मुद्यांबाबत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेल्या उत्तराशी सहमती दर्शवून दि. २८.०२.२०११ रोजी अपिलार्थीचे प्रथम अपील निकाली काढले आहे.

अपिलार्थी अनुपस्थित आहेत. आयोगापुढील युक्तिवाद व कागदपत्रांवरुन वर नमूद केलेल्या बाबी आयोगास आढळून येत आहेत. अपिलार्थीच्या आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपिलामध्ये त्यांनी त्यांच्या माहितीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. २,५,६ व ९ शी संबंधित माहितीची

मागणी कायम ठेवल्याचे दिसून येत आहे. तथापि अपिलार्थीचे दि. १५.०६.२०११ रोजीचे पत्र आयोगासमोर आहे. ज्यामध्ये असे नमूद केले आहे की, आता त्यांना आवश्यक असलेली माहिती पुरविण्यात आली असल्याने त्यांचे यासंदर्भात काही म्हणणे राहिलेले नाही. त्रयस्थ श्री. जळकोटे यांच्या संदर्भात दाखल केलेले द्वितीय अपील खारीज करण्यात यावे अशी विनंती या पत्राद्वारे अपिलार्थीने आयोगास केली आहे.

या सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ११-१०-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. ए.एम.शेख,संपादक,दै.लोकनेता,घर नं.१-१-५३, कोहिनुर कॉलनी,पानचक्की रोड,औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव (वि.चौ.), सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई -३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपसचिव (सेवा),सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्रीमती भारती श्रीधरराव पोफळी,<br>रा.अंबाजोगाई, जि.बीड | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याध्यापक,श्री योगेश्वरी नूतन विद्यालय,<br>अंबाजोगाई, जि.बीड | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (मा.), जिल्हा परिषद, बीड | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१९९१ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ११-१०-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्रीमती भारती श्रीधरराव पोफळी | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी -मुख्याध्यापक,श्री योगेश्वरी नूतन विद्यालय,अंबाजोगाई, जि.बीड-प्रतिनिधी -श्री. महेश मधुकरराव सबनीस, सहशिक्षक | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - शिक्षणाधिकारी (मा.), जिल्हा परिषद, बीड | : | अनुपस्थित |
| ३.४ | श्री. सोनवणे, तत्कालीन जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (मा),जि.प.बीड | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | : | दि. ०७.०८.२००८ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | : | दि. ०२.०९.२००८ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | : | प्रतीवर तारीख नाही. |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | : | दि. ०८.१२.२००८ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | : | दि. १२.०१.२००९ |

(फेरसादर ०२.०१.२०१०)

विचाराधीन प्रकरणात दि. ०३.०२.२०११ रोजी सुनावणी घेण्यात आली होती. त्यावेळी जन माहिती अधिकारी उपस्थित होते. तथापि अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित होते. प्रकरणात अपिलार्थी, सध्याचे व तत्कालीन अपिलीय अधिकारी यांची बाजू ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटले, त्यामुळे सुनावणी पुढे ढकलण्यात आली होती. या सुनावणीस अपिलार्थी,जन माहिती अधिकारी, सध्याचे व तत्कालीन अपिलीय अधिकारी यांना सर्व माहितीनिशी उपस्थित राहावे, असे सूचित करण्यात आले होते. तदनंतर दि.२०.०४.२०११ रोजीच्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व संबंधित अपिलीय अधिकारी यापैकी कोणीही उपस्थित नव्हते. दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटल्यामुळे प्रकरणाची सुनावणी पुनश्च पुढे ढकलण्यात आली होती. सदर प्रकरणात आज दि. ११.१०.२०११ रोजी पुन्हा सुनावणी घेण्यात येत आहे.आज सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक,योगेश्वरी नुतन विद्यालय,अंबाजोगाई,जि.बीड यांच्या प्रतिनिधीने आयोगास सुनावणीच्या वेळी अवगत केले की, दि. ०२.०९.२००८ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जासंदर्भात त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती दिली असून मुद्दा क्र.१ संदर्भात - लेखी परिक्षेची प्रक्रिया शालेय समितीच्या निर्णयानुसार रद्द करण्यात आली व संस्थाचालकाच्या आदेशानुसार रेकॉर्ड नष्ट करण्यात आले आहे, त्याचप्रमाणे मुद्दा क्र. २ व ३ संदर्भात केलेल्या कार्यवाहीबाबत कळविले आहे व निवड झालेल्या उमेदवारांच्या अनुभवाच्या प्रमाणपत्रांच्या छायांकित प्रती देण्यात आल्या आहेत, असेही सांगितले.

आयोगापुढील युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रांवरुन अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागितलेल्या माहितीतील देय होत असलेली माहिती अपिलार्थीस देण्यात आली आहे. तथापि या माहितीसंदर्भात त्यांच्या काही शंका असल्यास त्या शंकांचे निरसन अपिलार्थी संबंधित सार्वजनिक प्राधिकरणाच्या वरिष्ठ प्राधिकरणाकडे अथवा योग्य त्या न्यायाधिकरणाकडे स्वतंत्र अर्ज करुन प्राप्त करुन घेऊ शकतात.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ११-१०-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्रीमती भारती श्रीधरराव पोफळी, द्वारा श्री.शाम बारडकर, 'सौमित्र' चौसाळकर कॉलनी, अंबाजोगाई, जि.बीड

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक,श्री.योगेश्वरी नूतन विद्यालय,अंबाजोगाई, जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (मा.), जिल्हा परिषद, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. मोहंमद अब्दुल अजीज इंजिनियर,<br>रा.औरंगाबाद | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>अवर सचिव,सार्वजनिक बांधकाम विभाग,मंत्रालय,<br>मुंबई-३२ | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>उपसचिव (सेवा),सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय,<br>मुंबई-३२ | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००७/रामाआ/अपील/सिआर/२९५७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ११-१०-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. मो. अब्दुल अजीज इंजिनियर | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी -अवर सचिव,सार्वजनिक बांधकाम विभाग,मंत्रालय,मुंबई - श्री. दि. वा.दळवी | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी -उपसचिव (सेवा),सार्वजनिक बांधकाम विभाग,मंत्रालय,मुंबई - श्री. वि.वा.बोभाटे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ११.११.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १९.०२.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २२.०३.२००७ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १०.०५.२००७<br>(फेरसादर २१.०५.२००८) |

२) या प्रकरणाची सुनावणी यापूर्वी दि. ३१.०५.२०११ रोजी घेण्यात आली होती. त्यावेळी वेळी अपिलार्थी उपस्थित होते. तथापि जन माहिती व अपिलीय अधिकारी स्वत: अथवा त्यांचे प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नव्हते. त्यामुळे अपिलार्थी, सध्याचे व तत्कालीन जन माहिती व अपिलीय अधिकारी यांना सर्व माहितीनिशी (statement of facts) व्यक्तिश: उपस्थित राहावे अशा सूचना देण्यात येऊन सुनावणी पुढे ढकलण्यात आली होती. सदर प्रकरणात आज पुन्हा सुनावणी घेण्यात येत आहे. सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

३) जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या दि. ११.११.२००६ रोजीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जान्वये मौ. नागणी येथील कोंडलवाडी-बोधनरोड,जि.नांदेड येथील मांजरा नदीवरील पूल व अप्रोच रोडसंदर्भात विविध मुद्यांवर माहिती मागितली आहे. तो अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. २८.१२.२००६ रोजी प्राप्त झाला व या माहितीच्या संदर्भात अपिलार्थीस दि. २५.०१.२००७ रोजी अधिनियमातील कलम ७(१)नुसार विहित मुदतीत कळविण्यात आले आहे. त्याचप्रमाणे अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी तथा उपसचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग,मंत्रालय,मुंबई यांनी सुनावणी घेतली, त्यावेळी अपिलार्थी उपस्थित होते. यासंदर्भात त्यांनी दि. २२.०३.२००७ रोजी निर्णय दिला आहे की, अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती अधिनियमातील कलम ८(१)(j) नुसार उपस्थित केलेल्या मुद्यांवर माहिती उपलब्ध करुन देता येत नाही व अपिलार्थीचे अपील नामंजूर केले आहे. तसेच अपिलार्थी यांनी माहितीच्या अर्जात उल्लेखिलेल्या कामासंदर्भात हायकोर्टातही पी.आय.एल.दाखल केले आहे. या प्रकरणात मा. उच्च न्यायालयात दाखल करण्यासाठी उत्तर तयार करण्याची प्रक्रिया शासन स्तरावर प्रगतीपथावर आहे.

४) अपिलार्थी यांनी त्यांच्या युक्तिवादात आयोगास अवगत केले की, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्याकडून त्यांना माहिती मिळाली नाही. त्याचप्रमाणे प्रथम अपिलाचे सुनावणीच्या वेळी ठरल्याप्रमाणे मूळ अर्जातील क्र. 'एच' ते 'एन' हे मुद्दे त्यांच्या द्वितीय अपिलातून त्यांनी मागे घेतले आहेत. तथापि क्र.'ओ' या मुद्याबाबत तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव यांनी त्यांचा माहितीसाठीचा अर्ज अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, नांदेड यांच्याकडे पाठविणे आवश्यक होते. तसे न करता अपिलार्थीस त्यांनी त्या कार्यालयाकडे अर्ज करावा, असे कळविले आहे, ही बाब त्यांना मान्य नाही.

५) आयोगापुढे केलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रांवरुन आयोगास असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहितीसाठीच्या अर्जान्वये एकूण १५ ('ए' ते 'ओ') मुद्यांवर माहिती मागितली आहे. त्यातील काही मुद्दे प्रश्नार्थक स्वरुपाचे व लेखी स्पष्टीकरण अपेक्षित करणारे आहेत. यामुळे या मुद्यांची माहिती अधिनियमातील कलम २(च)मधील माहितीच्या व्याख्येतील तरतुदीनुसार सुसंगत नसल्याने देय होत नाही. अपिलार्थी यांच्या मूळ अर्जातील 'एच' ते 'एन' या क्रमांकाच्या मुद्यांची माहिती त्यांनी स्वेच्छेने मागे घेतली आहे व द्वितीय अपिलाच्या सुनावणीच्या वेळी मुद्दा 'ए', 'बी', 'सी' 'डी' 'इ', 'एफ', 'जी' व 'ओ' या मुद्यांवरील माहितीची मागणी कायम ठेवली

आहे. यामधील क्र. 'एफ' व 'जी'द्वारे प्रश्नार्थक स्वरुपाची माहिती मागितली असल्यामुळे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २(च)मध्ये दिलेल्या माहितीच्या व्याख्येनुसार, सुसंगत नसल्याने त्यासंदर्भातील माहितीही देय होत नाही. त्याचप्रमाणे क्र. 'इ' मधील माहिती लेखी स्वरुपात मागितली असल्यामुळे देय होत नाही, ही बाब अपिलार्थीने सुनावणीच्या वेळी मान्य केली. अपिलार्थी यांनी मुद्दा क्र. 'ए' व 'बी'द्वारे शासनाने दिलेल्या कारणे दाखवा नोटीसच्या प्रती, त्यावर अधिकाऱ्यांनी दाखल केलेल्या उत्तराच्या प्रती व त्यावर करण्यात आलेल्या कार्यवाहीच्या संदर्भात तयार झालेल्या टिपणीच्या प्रती व चौकशीचे अंतिम आदेशाच्या प्रती मागितल्या आहेत. सदर प्रकरण सन १९८९ सालचे असून सन १९९६ मध्ये चौकशी प्रक्रिया सुरु झाली व सन २००३-०४ मध्ये पूर्ण झाली आहे, असे आयोगाचे निदर्शनास आणून देण्यात आले आहे. सदरची कागदपत्रे ही शासकीय कामकाजामध्ये निर्माण झालेली असल्याकारणाने जन अपिलीय अधिकारी तथा उपसचिव यांनी माहिती नाकारण्यामागे घेतलेल्या कलम ८(१)(j) चा आधार आयोग मान्य करु शकत नाही. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार ही माहिती देय होत आहे. त्यामुळे ही माहिती अपिलार्थीस द्यावी लागेल. क्र. 'ए' या मुद्यावरील मागितलेली माहिती मुद्दा क्र. 'बी' मधील माहितीमध्ये अंतर्भूत असते, त्यामुळे मुद्दा 'ए' शी संबंधित माहितीची कागदपत्रे दिली नाहीत तरी मुद्दा क्र. 'बी' मध्ये उपलब्ध होतात, ही बाब विचारात घेता मुद्दा 'ए' ची कागदपत्रे स्वतंत्रपणे द्यावयाची आवश्यकता नाही व मुद्दा क्र.'बी' ची माहिती द्यावी, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे. ही बाब अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी मान्य केली. जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, मुद्दा क्र. 'बी', 'सी' व 'डी' च्या माहितीची एकंदर अंदाजे ७० ते ८० पृष्ठे होतील. अतः मुद्दा 'बी', 'सी' व 'डी' ची माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव यांना त्यांच्या कार्यालयात संकलीत करुन द्यावी लागेल. सबब या माहितीची एकूण पृष्ठ संख्या व शुल्काची रक्कम निश्चित करुन अपिलार्थीस पंधरा दिवसांच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे जन माहिती अधिकारी यांनी कळवावे व पुढील पंधरा दिवसांच्या आत अपिलार्थी यांनी शुल्काचा भरणा जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात करावा. तदनंतर जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस माहितीशी संबंधित कागदपत्रे नोंदणीकृत टपालाद्वारे पाठवावी लागतील.

६) क्र. 'ओ' या मुद्यावरील माहिती अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ,नांदेड यांच्याकडे उपलब्ध आहे, असे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. २५.०१.२००७ रोजीच्या पत्राद्वारे कळविले आहे. परंतु माहिती अर्जाची प्रत किंवा अर्जातील हा परिच्छेद अधिनियमातील कलम ६(३)(एक)नुसार सार्वजनिक बांधकाम मंडळ, नांदेडकडे हस्तांतरित केल्याचे आढळून येत नाही. याकरिता ही माहिती अपिलार्थीस देण्याकरिता अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ कार्यालयातील जन माहिती अधिकारी म्हणून सहायक अधीक्षक अभियंता (पी.ए.) यांना आयोगातर्फे निश्चित करण्यात येत आहे व त्यांनी या माहितीच्या संदर्भात आवश्यक शुल्काचा भरणा करणेसाठी अपिलार्थीस पंधरा दिवसांच्या आत कळवावे व पुढील पंधरा दिवसांच्या आत अपिलार्थी यांनी शुल्काचा भरणा केल्यावर नोंदणीकृत टपालाद्वारे माहिती

अपिलार्थीस पाठविण्याची व्यवस्था करणे आवश्यक आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१) जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव(विभागीय चौकशी),सा.बां.वि.मंत्रालय,मुंबई यांनी वर निर्णयात नमूद केल्याप्रमाणे मुद्दा क्र. 'बी', 'सी' व 'डी'च्या माहितीचे शुल्क अपिलार्थीने भरल्यानंतर देय होत असलेली माहिती अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाद्वारे विहित केलेल्या मुदतीत पाठविण्याची कार्यवाही करावी.

२) सहायक अधीक्षक अभियंता,सार्वजनिक बांधकाम मंडळ,नांदेड यांनी वर निर्णयात नमूद केल्याप्रमाणे मुद्दा क्र. 'ओ' च्या माहितीचे शुल्क अपिलार्थी यांनी भरल्यानंतर देय असलेली माहिती अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाद्वारे पाठविण्याची व्यवस्था विहित मुदतीत करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ११-१०-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. मोहम्मद अब्दुल अजीज इंजिनियर, घर नं. १-१५-५०, नेहरु भवनजवळ, बुढीलेन,औरंगाबाद - ४३१ ००१.

२. जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव(विभागीय चौकशी),सार्वजनिक बांधकाम विभाग,मंत्रालय,मुंबई-३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन माहिती अधिकारी तथा सहायक अधीक्षक अभियंता,सार्वजनिक बांधकाम मंडळ, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जन अपिलीय अधिकारी तथा उपसचिव (सेवा),सार्वजनिक बांधकाम विभाग,मंत्रालय,मुंबई-३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री.शामराव सुंदरराव खरात,रा.पाथरवाला : अपिलार्थी
बु.ता.अंबड,जि.जालना.

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
कक्ष अधिकारी,जलसंपदा व लाभक्षेत्र विकास
विभाग,मंत्रालय,मुंबई
जन अपिलीय अधिकारी तथा
उपसचिव (आस्थापना),जलसंपदा विभाग,मंत्रालय,मुंबई

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/६८७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ११-१०-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री.शामराव सुंदरराव खरात | : | उपस्थित |
| ३.२ | १)जन माहिती अधिकारी - अवर सचिव(दक्षता), जलसंपदा विभाग,मंत्रालय,मुंबई - श्री. ग.शा.सोनवणे | : | उपस्थित |
| | २)जन माहिती अधिकारी - अवर सचिव, जलसंपदा विभाग,मंत्रालय,मुंबई- श्री. प्र.प्र.गोसावी | : | उपस्थित |
| ३.३ | १)जन अपिलीय अधिकारी -उपसचिव (आस्था.),जलसंपदा विभाग,मंत्रालय,मुंबई- श्री. अ.अ.कोदे | : | उपस्थित |
| | २)जन अपिलीय अधिकारी -उपसचिव (प्रशा.),जलसंपदा विभाग,मंत्रालय,मुंबई - श्री. वि.र.दहिफळे | : | उपस्थित |

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २१.०७.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. ०५.१०.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | - |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. १२.११.२०१०

यापूर्वी या प्रकरणात दि. १८-०५-२०११ रोजी सुनावणी घेण्यात आली. त्यावेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित होते. अपिलार्थी अनुपस्थित होते. अपिलार्थी यांनी दि. १२.०५.२०११ रोजीच्या पत्राद्वारे सुनावणी पुढे ढकलण्याची विनंती केल्यामुळे अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांना पुढील सुनावणीस व्यक्तिशः उपस्थित राहण्याच्या सूचना देण्यात येऊन सुनावणी पुढे ढकलण्यात आली होती. प्रकरणात आज दि. ११.१०.२०११ रोजी सुनावणी घेण्यात येत आहे. सुनावणीसाठी अपिलार्थी, संबंधित जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

आयोगापुढील कागदपत्रे व युक्तिवादावरुन यापूर्वी आयोगाकडे दाखल झालेल्या अपिलार्थीच्या क्र. ६८६/१० या अपील प्रकरणात आयोगाने निर्णय दिलेला असून अपिलार्थीचा विचाराधीन अपील अर्ज व यापूर्वी सुनावणी झालेला क्र.६८६/१० या दोनही अपिलाशी संबंधित मूळ अर्ज एकसारखेच असल्याचे आढळून येत आहे. या प्रकरणात आयोगाने यापूर्वीच निर्णय दिलेला असल्यामुळे अपिलार्थीचे विचाराधीन अपील निष्प्रभ ठरत आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ११-१०-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. शामराव सुंदरराव खरात, रा.पाथरवाला बु.ता.अंबड,जि.जालना

२. जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव(दक्षता), जलसंपदा विभाग,मंत्रालय,मुंबई यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव, जलसंपदा विभाग,मंत्रालय,मुंबई यांना या

निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी

४. जन अपिलीय अधिकारी तथा उपसचिव (आस्था.),जलसंपदा विभाग,मंत्रालय,मुंबइ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. जन अपिलीय अधिकारी तथा उपसचिव (प्रशा.),जलसंपदा विभाग,मंत्रालय,मुंबई यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. जावळे दिलीपकुमार विठ्ठलराव, : अपिलार्थी
रा. समता कॉलनी, सेनगांव, तालुका सेनगांव,
जिल्हा हिंगोली

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
जिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली
जन अपिलीय अधिकारी तथा :
जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/२९८ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १२-१०-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. जावळे दिलीपकुमार विठ्ठलराव | : उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २८-०५-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. ३०-०६-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ११-०८-२०१० |

यापूर्वी या प्रकरणाची सुनावणी दि. ०३.०३.२०११ रोजी हिंगोली येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित होते. जन माहिती व अपिलीय अधिकारी अनुपस्थित होते. या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी त्यांना अद्यापपर्यंत माहिती मिळालेली नाही, असे आयोगास अवगत केले. ही बाब तसेच जन माहिती व अपिलीय अधिकारी अथवा त्यांचे प्रतिनिधी यांची

अनुपस्थिती याची गंभीर दखल आयोगाने घेतली आहे. त्यांचे म्हणणे ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटल्यामुळे पुढील सुनावणीस अपिलार्थी, सध्याचे व तत्कालीन जन माहिती व अपिलीय अधिकारी यांना व्यक्तिशः उपस्थित राहावे लागेल असे सूचित करुन सुनावणी पुढे ढकलण्यात आली होती. सदर सुनावणी दि. २८.०४.२०११ रोजी घेण्यात आली. या सुनावणीस देखील अपिलार्थी उपस्थित होते. तथापि संबंधित जन माहिती व अपिलीय अधिकारी अनुपस्थित होते. त्यांच्या अनुपस्थितीमुळे पुन्हा सुनावणीची पुढील तारीख देण्यात आली.

सदर प्रकरणात आज दिनांक १२.१०.२०११ रोजी सुनावणी घेण्यात येत आहे. सुनावणीसाठी आज देखील अपिलार्थी उपस्थित आहेत. तथापि जन माहिती व अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. या तीनही सुनावणीच्या वेळी म्हणजे दि. ०३.०३.२०११,२८.०४.२०११ व १२.१०.२०११ रोजी जिल्हाधिकारी,हिंगोली कार्यालयातील संबंधित जन माहिती व अपिलीय अधिकारी आयोगापुढे सुनावणीस उपस्थित राहिले नाहीत. या बाबीची नोंद आयोग घेत असून याकरिता संबंधिताचा खुलासा जिल्हाधिकारी,हिंगोली यांनी मागविणे आवश्यक ठरत आहे व तदनंतर अनुपस्थितीबाबत त्यांना संबंधितांविरुध्द यथोचित प्रशासकीय कारवाई करावी लागेल. अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती तलाठी/लिपीक-टंकलेखक या पदाच्या भरती प्रक्रियेसंदर्भातील आहे. यामध्ये व्यापक जनहित दिसून येत आहे. याकरिता जिल्हाधिकारी, हिंगोली यांनी हे प्रकरण व्यक्तिशः हाताळावे व अपिलार्थीने मूळ अर्जाद्वारे मागितलेली माहिती संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यामार्फत देण्याची व्यवस्था करावी, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

१) जिल्हाधिकारी, हिंगोली यांनी वर नमूद केल्याप्रमाणे जिल्हाधिकारी कार्यालयातील संबंधित जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्या आयोगासमोरील सुनावणीच्या वेळीच्या अनुपस्थितीबाबतचा खुलासा मागवून यथोचित प्रशासकीय कारवाई करावी.ही कार्यवाही आयोगाचे आदेश प्राप्त होताच दोन महिन्याच्या आत पूर्ण करावी.

२) जिल्हाधिकारी, हिंगोली यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीने मूळ अर्जाद्वारे मागितलेली माहिती आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठविली जाईल, अशी व्यवस्था करावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक १२-१०-२०११**

---------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. जावळे दिलीपकुमार विठ्ठलराव, रा. समता कॉलनी, सेनगांव, तालुका सेनगांव, जिल्हा हिंगोली.

२. जन माहिती अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जिल्हाधिकारी, हिंगोली यांना अपिलार्थीच्या मूळ माहिती अर्जाच्या प्रतीसह या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. ईश्वर लक्ष्मण मोरे : अपिलार्थी
रा.पैठण, जि.औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
जिल्हाधिकारी कार्यालय,औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय,औरंगाबाद

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/४७४ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १२-१०-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. ईश्वर लक्ष्मण मोरे | : उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - तहसीलदार (महसूल), जिल्हाधिकारी कार्यालय,औरंगाबाद - सौ.ज्योत्स्ना धुळे | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - निवासी उपजिल्हाधिकारी, औरंगाबाद | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. - |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०२.०३.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १९.०४.२०१० |

यापूर्वी या प्रकरणात दि. ०४-०५-२०११ रोजी सुनावणी घेण्यात आली. त्यावेळी अपिलार्थी उपस्थित होते. जन माहिती व अपिलीय अधिकारी अनुपस्थित होते. त्यांची बाजू ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटल्यामुळे अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी

यांना पुढील सुनावणीस व्यक्तिशः उपस्थित राहण्याच्या सूचना देण्यात येऊन सुनावणी पुढे ढकलण्यात आली होती. प्रकरणात आज दि. १२.१०.२०११ रोजी सुनावणी घेण्यात येत आहे. सुनावणीसाठी जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. अपिलार्थी व  जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या दि. १८.०१.२०१० रोजीच्या मूळ माहितीसाठीच्या अर्जान्वये भ्रष्टाचार निर्मूलन समितीबाबत विविध मुद्यांद्वारे माहिती मागितली आहे. हा अर्ज त्यांच्या कार्यालयात २०.०१.२०१० रोजी प्राप्त झाला. त्याअनुषंगाने दि. १५.०२.२०१० रोजी ₹५६०/- इतक्या शुल्काचा भरणा करावा, असे अपिलार्थीस कळविले आहे. अपिलार्थी यांनी प्रतिसाद दिलेला नाही. अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी अवगत केले की, त्यांना हे पत्र प्राप्त झाले नाही. तथापि ₹१०/- प्रतिपृष्ठ दर लावण्यात आला आहे.त्यामुळे माहिती अधिकार अधिनियमान्वये प्रतिपृष्ठ ₹२/- असा दर लावण्यात यावा. त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी माहितीची पृष्ठसंख्या व प्रतिपृष्ठ ₹२/- दराप्रमाणे शुल्काची आकारणी करुन निश्चित केलेल्या शुल्काची रक्कम अपिलार्थीस पंधरा दिवसांच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे कळवावी. तदनंतर अपिलार्थी यांनी शुल्काची रक्कम जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात भरणा करावी. अपिलार्थीने शुल्काची रक्कम जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात भरल्यानंतर तीस दिवसांच्या आत अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाद्वारे माहिती पाठवावी लागेल, असे आयोगाने सुनावणीमध्ये निर्देश दिले. त्याप्रमाणे कार्यवाही करण्याचे अपिलार्थी तसेच जन माहिती अधिकारी यांनी मान्य केले.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीने त्यांच्या कार्यालयात शुल्काची रक्कम भरल्यास पुढील तीस दिवसांच्या आत अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज विचारात घेऊन नोंदणीकृत टपालाद्वारे माहिती पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १२-१०-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. ईश्वर लक्ष्मण मोरे,अभिनय टेलर्स,हॉटेल न्यु दुर्गासमोर, पैठण, जि.औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार (महसूल), जिल्हाधिकारी कार्यालय,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. मोहसीन अहमद बशीर अहमद, : अपिलार्थी
प्लॉट नं. १३, बशीर कॉलनी, रोशनगेट, औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
सहायक संचालक, नगर रचना विभाग, महानगरपालिका,
औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा :
सहायक संचालक, नगर रचना विभाग, महानगरपालिका,
औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/४७६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १२-१०-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. मोहसीन अहमद बशीर अहमद | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, नगर रचना विभाग, महानगरपालिका, औरंगाबाद - श्री. वसंत मा. निकम | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा सहायक संचालक, नगर रचना विभाग, महानगरपालिका, औरंगाबाद - श्री. डी.पी.कुलकर्णी | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २३-१२-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०३-०२-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १७-०३-२०१० |

या प्रकरणाची सुनावणी यापूर्वी दि. ०५.०५.२०११ रोजी घेण्यात आली होती. त्यावेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित होते. या सुनावणीच्या वेळी सादर करण्यात आलेली कागदपत्रे व युक्तिवाद यावरुन अपिलार्थी यांनी सार्वजनिक उपक्रमाबाबत माहिती मागितली असल्याकारणाने माहितीच्या प्रती त्यांना देय असल्यामुळे व प्रकरणात अपिलार्थीस माहिती पुरविण्यास विलंब झाल्याचे दिसून येत असल्यामुळे आयोगाने आयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद जे कार्यालयाचे प्रमुख असून त्यांचे प्रशासकीय नियंत्रण असल्यामुळे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ (३) (ड) अन्वये सदर प्रकरणी त्यांना पुढील सुनावणीच्या वेळी सर्व माहितीनिशी विशेष साक्षीकरिता आयोगापुढे उपस्थित राहावे लागेल, अशा सूचना देण्यात येऊन सुनावणी पुढे ढकलण्यात आली होती. आज रोजी सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. आयुक्त, महानगरपालिका,औरंगाबाद यांनी आज रोजीच्या सुनावणीस अनुपस्थित राहण्याची परवानगी मागितली आहे. त्यास मान्यता देण्यात येत आहे.

आयोगापुढे झालेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रांवरुन असे स्पष्ट होत आहे की, अपिलार्थी यांनी अतिक्रमण झालेल्या जागेसंदर्भात सन २००५ मध्ये आयुक्त, मनपा यांना पत्राने कळविले होते. त्यावर मा.लोकायुक्त यांच्या दि. ०१.१२.२००५ रोजीच्या पत्राचा उल्लेख करण्यात आला होता. त्यावर आयुक्त,महानगरपालिका यांनी अतिक्रमण काढण्यात यावे, असे आदेश दिलेले आहेत. यावर काय कार्यवाही झाली याबाबतची माहिती अपिलार्थी मागत आहेत. ही कागदपत्रे अपिलार्थीस अर्जाच्या प्रतीसह पंधरा दिवसांच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे पाठविण्यात यावीत. विलंब झाल्यास आयोग गंभीर दखल घेईल, अशी समज जन माहिती अधिकारी यांना देण्यात आली. सदर माहिती कथित अतिक्रमणाशी संबंधित असल्यामुळे व ही माहिती उघड करण्यामध्ये व्यापक जनहित साध्य होत आहे. यामुळे जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस वर नमूद केल्याप्रमाणे कागदपत्रे तात्काळ देण्याची व्यवस्था करावी, असे आयोगाचे निदेश आहेत.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## **आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने माहितीसाठीच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेल्या माहितीतील आयुक्त, महानगरपालिका यांनी संबंधित अतिक्रमण काढण्याबाबत दिलेल्या आदेशावर केलेली कार्यवाही दर्शविणारी कागदपत्रे आयोगाचे हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावीत.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १२-१०-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

-----------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. मोहसीन अहमद बशीर अहमद, प्लॉट नं. १३, बशीर कॉलनी, रोशनगेट, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, नगर रचना विभाग, महानगरपालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक संचालक, नगर रचना विभाग, महानगरपालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. आयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. सुरेशचंद्र रामचंद्र एकबोटे, : अपिलार्थी
'तुळजाई' ४१, श्रीनगर कॉलनी, संत एकनाथ हॉस्पिटल
समोर, उल्कानगरी, औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
नगर रचना विभाग, महानगरपालिका, औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा :
सहायक संचालक, नगर रचना विभाग, महानगरपालिका,
औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/४७८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १२-१०-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. सुरेशचंद्र रामचंद्र एकबोटे | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, नगर रचना, महानगरपालिका, औरंगाबाद - श्री. वसंत मा. निकम | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा सहायक संचालक, नगर रचना, महानगरपालिका, औरंगाबाद- श्री. डी. पी.कुलकर्णी | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १३-०१-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १७-०२-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २०-०४-२०१० |

यापूर्वी या प्रकरणाची दि. ०५.०५.२०११ रोजी सुनावणी घेण्यात आली होती. त्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित होते. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित होते, या

बाबीची आयोगाने गंभीर दखल घेतली होती.तसेच सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी आयोगापुढे अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या दिनांक १३-०१-२०१० रोजीच्या अर्जासंदर्भात योग्य ती माहिती पुरवू शकले नाहीत. त्यामुळे जन माहिती व अपिलीय अधिकारी यांना अपिलार्थीच्या माहिती अर्जासंदर्भात कार्यवाही करण्यास वेळ देऊन सर्व संबंधितांना पुढील सुनावणीच्यावेळी आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहण्याच्या सूचना देण्यात येऊन प्रकरणात सुनावणी पुढे ढकलण्यात आली होती. प्रकरणात आज दि. १२.१०.२०११ रोजी पुन्हा सुनावणी घेण्यात येत आहे. आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती माहे ऑगस्ट, २०११ रोजी मा.राज्य माहिती आयोगाकडे या प्रकरणी यापूर्वी झालेल्या सुनावणीनंतर देण्यात आली आहे. अपिलार्थी यांनी त्यांना माहिती मिळाल्याचे मान्य केले. तथापि त्यांनी आयोगास सांगितले की, त्यांना विलंबाने माहिती मिळालेली आहे. याकरिता जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडे येणाऱ्या ज्येष्ठ नागरिक/विकलांग/महिला अर्जदारांना अशाप्रकारे त्रास होऊ नये, यासाठी कार्यवाही करणे गरजेचे आहे, याची जन माहिती अधिकारी यांना सुनावणीमध्ये आयोगातर्फे समज देण्यात आली.

या सर्व बाबी विचारात घेता आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १२-१०-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सुरेशचंद्र रामचंद्र एकबोटे, 'तुळजाई' ४१, श्रीनगर कॉलनी, संत एकनाथ हॉस्पिटल समोर, उल्कानगरी, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, नगर रचना, महानगरपालिका, औरंगाबाद

यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक संचालक, नगर रचना, महानगरपालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. महेंद्र ठमाजी साळवे<br>राजे संभाजी कॉलनी, प्लॉट नं. २३/१, हर्सूल, औरंगाबाद | : | अपिलार्थी |
| २ | बी. आर. पाटील,<br>राजे संभाजी कॉलनी, प्लॉट नं. २३/१, हर्सूल, औरंगाबाद | | |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी,<br>पंचायत समिती कार्यालय, जालना<br>जन अपिलीय अधिकारी,<br>पंचायत समिती कार्यालय, जालना | : | उत्तरवादी |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/४८३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १२-१०-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | सध्याचे जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी,पंचायत समिती कार्यालय, जालना - श्री. ए.एस.पुराणिक | : | उपस्थित |
| ३.३ | तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी,पंचायत समिती कार्यालय, जालना - श्री. डी.बी.सोनवणे | : | उपस्थित |
| ३.४ | सध्याचे जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी,पंचायत समिती कार्यालय, जालना - श्रीमती एस.डी.लोंढे | : | उपस्थित |
| ३.५ | तत्कालीन जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी,पंचायत समिती कार्यालय, जालना - श्री. पी.एम.भावसार | : | उपस्थित |

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. २८-१०-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | - |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १९-०१-२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २९-०४-२०१० |

यापूर्वी या प्रकरणाची दि. ०५.०५.२०११ रोजी सुनावणी घेण्यात आली होती. त्यावेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी सर्वजण अनुपस्थित होते. प्रकरणात सद्यस्थिती आयोगास अवगत होऊ शकत नसल्यामुळे व दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटल्यामुळे अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांना पुढील सुनावणीस व्यक्तिशः उपस्थित राहणे आवश्यक राहील,असे सूचित करुन सुनावणी पुढे ढकलण्यात आली होती. प्रकरणात आज दि. १२.१०.२०११ रोजी पुन्हा सुनावणी घेण्यात येत आहे. आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. सध्याचे व तत्कालीन जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेली संपूर्ण माहिती दि. ०३.०५.२०१० रोजी अपिलार्थीस देण्यात आली आहे. याबाबतची पोच अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांना दिली आहे. ती जन माहिती अधिकारी यांच्या अभिलेखात उपलब्ध आहे. आज रोजी अपिलार्थी यांचे दि. १९.०९.२०११ रोजीचे पत्र आयोगापुढे आहे. त्यामध्ये त्यांनी नमूद केले आहे की, दि. २९.०४.२०१० रोजी दि. २८.१०.२००९ रोजीच्या माहितीसाठीच्या अर्जासंदर्भात केलेले द्वितीय अपील निकाली काढण्यात यावे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १२-१०-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. महेंद्र ठमाजी साळवे,राजे संभाजी कॉलनी, प्लॉट नं. २३/१, हर्सूल, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, पंचायत समिती कार्यालय, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती कार्यालय, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. दिलीप कचरदास नावंदर, : अपिलार्थी
रा.गंगापूर,ता.जि.औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
तहसीलदार, गंगापूर, जि.औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा :
उपविभागीय अधिकारी, वैजापूर, जि.औरंगाबाद

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/४८८ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १२-१०-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. दिलीप कचरदास नावंदर | : उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. १४.०१.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. ०२.०३.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २८.०४.२०१० |

यापूर्वी या प्रकरणात दि. ०५-०५-२०११ रोजी सुनावणी घेण्यात आली. त्यावेळी अपिलार्थी उपस्थित होते. जन माहिती व अपिलीय अधिकारी स्वतः अथवा त्यांचे प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नव्हते. दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेणे आवश्यक वाटल्यामुळे सर्व संबंधितांना आवश्यक कागदपत्रांसह पुढील सुनावणीच्यावेळी उपस्थित राहण्याच्या सूचना देऊन प्रकरणाची सुनावणी पुढे ढकलण्यात आली होती. प्रकरणात आज दि. १२.१०.२०११ रोजी सुनावणी घेण्यात

येत आहे. सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. त्यांच्या अनुपस्थितीची गंभीर दखल आयोग घेत आहे. अपिलार्थी यांनी दि. १४.०१.२०१० रोजीच्या अर्जान्वये मौजे शिंगी येथील केरोसिन परवानाधारक व स्वस्तधान्य दुकानाबाबत माहिती मागितली आहे. ती त्यांना अद्यापपर्यंत प्राप्त झाली नाही. अपिलार्थीच्या दि. ०२.०३.२०१० रोजीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, वैजापूर, जि.औरंगाबाद यांनी सुनावणी घेऊन दि. २५.०७.२०११ रोजी निर्णय दिला आहे की, अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य देण्यात यावी.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व उपरोक्त कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांनी सन १९९० ते २००९ या कालावधीची विस्तृत अशी माहिती त्रयस्थ स्वस्तधान्य दुकानदार यांच्याबाबत मागितली आहे. माहितीचा कालावधी पाहता जन माहिती अधिकारी यांना माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७(९) नुसार एक दिवस (वेळ सकाळी ११.०० ते सायं.०५.००) निश्चित करुन अपिलार्थीने मागितलेल्या माहितीशी संबंधित स्वस्तधान्य दुकानदाराचे सर्व अभिलेखे मागवून त्यांच्या कार्यालयात अपिलार्थीस पाहणीसाठी उपलब्ध करुन द्यावे लागतील व त्यातून अपिलार्थीस आवश्यक असलेल्या काही कागदपत्रांच्या छायाप्रती विनामूल्य द्याव्या लागतील. अपिलार्थीस याबाबत नोंदणीकृत टपालाद्वारे सूचित करावे लागेल.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या माहिती अर्जावर अद्यापपावेतो कोणतीही कार्यवाही केलेली नाही. याद्वारे अधिनियमातील कलम ७(१)चा भंग झालेला आहे. अधिनियमातील कलम २०(१)नुसार ते शास्तीस पात्र ठरत आहेत. त्यांना शास्ती का लावण्यात येऊ नये याबाबतचा त्यांचा खुलासा त्यांना अधिनियमातील कलम २०(१)च्या परंतुकानुसार हीच कारणे दाखवा नोटीस समजून जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांच्यामार्फत आयोगास सादर करावा लागेल. जिल्हाधिकारी,औरंगाबाद यांनी हे आदेश संबंधित जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार,गंगापूर,जि.औरंगाबाद यांना हे आदेश तामिल करावेत.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## **आदेश**

१) जन माहिती अधिकारी यांनी एक दिवस निश्चित (वेळ सकाळी ११.०० ते सायं.०५.००) करुन अपिलार्थीने मागितलेल्या माहितीशी संबंधित अभिलेखे पाहणीसाठी अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावेत व त्यातून अपिलार्थीस आवश्यक असलेल्या काही कागदपत्रांच्या छायाप्रती विनामूल्य द्याव्यात. ही कार्यवाही हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत पूर्ण करावी.

२) जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील कलम ७(१)चा भंग केला असल्यामुळे त्यांना शास्ती का लावण्यात येऊ नये याबाबतचा त्यांचा खुलासा त्यांनी अधिनियमातील कलम २०(१)च्या परंतुकानुसार हीच कारणे दाखवा नोटीस समजून

जिल्हाधिकारी,औरंगाबाद यांच्यामार्फत आयोगास हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत सादर करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १२-१०-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. दिलीप कचरदास नावंदर,रा.राजीव गांधी चौक,गंगापूर,जि.औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार,गंगापूर,जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, वैजापूर,जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जिल्हाधिकारी,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. उस्मानशाह ई.अन्वीकर,<br>रा.औरंगाबाद | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>संशोधन अधिकारी तथा<br>सदस्य सचिव, विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती<br>क्र.१,औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>विभागीय समाज कल्याण अधिकारी (जा.प्र.प.स.),<br>विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती<br>क्र.१,औरंगाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/४९५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १२-१०-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. उस्मानशाह ई.अन्वीकर व त्यांचे मदतनीस श्री. हाजी अे.पी.शाह | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - संशोधन अधिकारी तथा सदस्य सचिव, विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्र.१,औरंगाबाद- प्रतिनिधी - श्री. सोनवणे, जनसंपर्क अधिकारी | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - विभागीय समाज कल्याण अधिकारी (जा.प्र.प.सं.),विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्र.१,औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०१.०८.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०७.०८.२००९ |

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | - |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २०.०४.२०१० |

यापूर्वी या प्रकरणात दि. ०५-०५-२०११ रोजी सुनावणी घेण्यात आली. त्यावेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित होते. सदर सुनावणीच्या वेळी दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले होते. जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्यावेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे 'छप्परबंद वि.जा' या जातीच्या वैधता प्रमाणपत्राबाबत माहिती मागितलेली आहे. जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि. ०७.०८.२००९ रोजीच्या पत्राद्वारे जातनिहाय उमेदवारांचे रेकॉर्ड ठेवण्यात आलेले नाही त्यामुळे छप्परबंद जातीनिहाय उमेदवारांच्या नावाची माहिती देणे शक्य नाही. केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ११ नुसार त्रयस्थ पक्षाची वैयक्तिक माहिती असल्यामुळे त्यांची संमती घेणे आवश्यक आहे. त्याचबरोबर आपण मागितलेली माहिती सन २०००-०९ या कालावधीतील उमेदवारांचे नाव पत्त्यासह देण्यात यावा म्हणजे माहिती देणे सोयीचे होईल, असे कळविलेले आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर दि. १५.०२.२०१० रोजी सुनावणी घेतली व त्यामध्ये निर्णय दिला आहे की, केंद्रीय माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ११ नुसार त्रयस्थ पक्षाकडून संमती प्राप्त करावी व अपिलकाराने मागणी केलेल्या माहितीची तरतुद मुख्यालयाकडून प्राप्त करुन घेऊन तरतुद उपलब्ध झाल्यानंतर अपिलार्थीस ६० दिवसांच्या आत माहिती देण्यात यावी. अपिलार्थी हे दारिद्रयरेषेखालील व्यक्ती आहेत. जन माहिती अधिकारी यांनी पुढे असेही सांगितले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जामध्ये दोन त्रयस्थ व्यक्तींची माहिती देण्याचे कळविले आहे. त्यापैकी एका व्यक्तीस विचारणा केली असता त्यांनी त्यांच्यासंदर्भातील माहिती वैयक्तिक असल्याकारणाने त्यांची माहिती देण्यास आक्षेप घेतला आहे.

अपिलार्थी यांनी त्यांच्या युक्तिवादात आयोगास असे सांगितले की छप्परबंद या जातीच्या वैध प्रमाणपत्राच्या सर्व अर्जदाराची माहिती त्यांना आवश्यक आहे व या माहितीमध्ये वैयक्तिक अशा माहितीचा समावेश होत नाही. या माहितीचा वापर काही गरजू छप्परबंद उमेदवार करु शकतील.

दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर आयोगाने असे सूचित केले की, दोनही बाजूंनी छप्परबंद वि.जा.वैध प्रमाणपत्राकरिता विहित मापदंडाप्रमाणे किमान आवश्यक कागदपत्रांची यादी आयोगापुढे सादर करावी. त्यावर अवलंबून त्रयस्थ पक्षाच्या वैयक्तिक बाबीत हस्तक्षेप होणार नाही, हे पाहून निर्णय घेणे योग्य ठरेल. याकरिता सुनावणी पुढे ढकलण्यात येत असून पुढील सुनावणीस दोनही बाजूंकडून या बाबीवर आयोगापुढे बाजू मांडण्यासाठी संबंधित जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी व्यक्तिशः उपस्थित राहणे आवश्यक राहील. त्याचप्रमाणे अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीची व्याप्ती फार मोठया प्रमाणात असल्याचे दिसून आले असल्यामुळे पुढील

सुनावणीच्यावेळी त्यांना मागितलेल्या माहितीची व्याप्ती कमी करण्यासाठी स्वेच्छेने विचार करावा लागेल.तसेच माहिती उघड केल्याने साध्य होणाऱ्या व्यापक जनहिताबाबत बाजू मांडावी लागेल.

प्रकरणात आज दि. १२.१०.२०११ रोजी पुन्हा सुनावणी घेण्यात येत आहे. सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. त्यांनी त्यांच्या दि.११.१०.२०११ रोजीच्या पत्राद्वारे सुनावणी पुढे ढकलण्यात यावी अशी आयोगास विनंती केली आहे. मागील सुनावणीत सूचित केल्यानुसार अपिलार्थी तसेच जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी त्यांचे लेखी म्हणणे आयोगाकडे पुढील सुनावणीच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे, असे सूचित करण्यात येऊन सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**अंतरिम आदेश**

या द्वितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीची तारीख सर्व संबंधितांना यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे लिखित युक्तिवादासह सर्व वस्तुनिष्ठ माहितीनिशी व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १२-१०-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. उस्मानशाह इब्राहिमशाह अन्वीकर, उपाध्यक्ष, मुस्लीम छप्परबंद शाह सामाजिक विकास मंडळ, गल्ली नं.२०, इंदिरानगर,बायजीपुरा,औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी तथा सदस्य सचिव, विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्र.१,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय समाज कल्याण अधिकारी, विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्र.१,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. सुनिल दत्तात्रय शेटे, : अपिलार्थी
रा. बिडकीन, तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, बिडकीन, तालुका पैठण,
जिल्हा औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी तथा :
गट विकास अधिकारी, पंचायत समिती, पैठण,
तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/४९६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १२-१०-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. सुनिल दत्तात्रय शेटे | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, बिडकीन, तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद - श्री. बी.टी.साळवे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पं.), पंचायत समिती, पैठण, तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद - श्री. जी.एस.पवार | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०२-०२-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १०-०३-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. २०-०५-२०१०

यापूर्वी या प्रकरणात दि. ०६-०५-२०११ रोजी सुनावणी घेण्यात आली. त्यावेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित होते. जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित होते. दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेणे आवश्यक वाटल्यामुळे सर्व संबंधितांना आवश्यक कागदपत्रांसह पुढील सुनावणीच्यावेळी उपस्थित राहण्याच्या सूचना देण्यात येऊन प्रकरणाची सुनावणी पुढे ढकलण्यात आली होती. प्रकरणात आज दि. १२.१०.२०११ रोजी पुन्हा सुनावणी घेण्यात येत आहे. आज सुनावणीसाठी अपिलार्थी,जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहितीसाठीच्या अर्जान्वये मौ.बिडकीन,ता.पैठण येथील पैठण रोडवरील गाळे भाडेतत्त्वावर देण्यासंदर्भात ठरावाची प्रत, जागेचा उतारा, जाहिर प्रसिध्दीची प्रत मागितली आहे. या सर्व माहितीच्या प्रती अपिलार्थीच्या प्रथम अपिलच्या सुनावणीच्या वेळी दि. ०९.०४.२०११ रोजी देण्यात आल्या आहेत. अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांना माहिती मिळाल्याचे मान्य केले.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक १२-१०-२०११**

--------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सुनिल दत्तात्रय शेटे, रा. बिडकीन, तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, बिडकीन, तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, पैठण, तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४.		निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. सै. शौकत सै.कासीम, : अपिलार्थी
रा.औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
तहसीलदार (सा.प्र.),
विभागीय आयुक्त कार्यालय,औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा :
अपर विभागीय आयुक्त,
विभागीय आयुक्त कार्यालय,औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/५१२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १२-१०-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - तहसीलदार (सा.प्र.), विभागीय आयुक्त कार्यालय,औरंगाबाद -प्रतिनिधी- श्री. ए.एम.चौधरी, नायब तहसीलदार | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - अपर विभागीय आयुक्त, औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २९.१२.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०३.०४.२०१० |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १३.०३.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १६.०४.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ११.०५.२०१० |

यापूर्वी या प्रकरणाची दि. ०६.०५.२०११ रोजी सुनावणी घेण्यात आली होती. त्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी अनुपस्थित होते.त्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते. अपिलार्थी अनुपस्थित होते. दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटल्यामुळे सर्व संबंधितांना पुढील सुनावणीच्यावेळी आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहण्याच्या सूचना देण्यात येऊन प्रकरणात सुनावणी पुढे ढकलण्यात आली होती. आज दि. १२.१०.२०११ रोजी प्रकरणात पुन्हा सुनावणी घेण्यात येत आहे. सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थीने त्यांच्या दि. २९.१२.२००९ रोजीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाद्वारे अभिवचन रजेबाबत या विषयावर एकूण ६ मुद्यांवर विस्तृत स्वरुपाची माहिती मागितली आहे. माहितीशी संबंधित कालावधी जानेवारी, २००८ ते डिसेंबर, २००९ असा आहे. या माहितीपैकी देय व उपलब्ध असलेली माहिती दि. ०३.०४.२०१० रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस देण्यात आली आहे. अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी तथा अपर विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांनी दि. ०९.०४.२०१० रोजी निर्णय दिला आहे की, अपिलार्थी यांना मुद्दा क्र. १ ते ४ बाबत दि. ०३.०४.२०१० रोजी माहिती देण्यात आली आहे व मुद्दा क्र. ५ व ६ बाबत माहिती संकलीत करुन देण्याची आवश्यकता नाही.

अपिलार्थी यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये आयोगास असे अवगत केले की, त्यांना अपूर्ण, असमाधानकारक माहिती पुरविण्यात आली आहे. मुद्दा क्र. १ अंशतः व मुद्दा क्र.५ व ६ शी संबंधित संपूर्ण माहिती त्यांना प्राप्त झालेली नाही.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रांवरुन अपिलार्थीने त्यांच्या माहितीच्या अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीपैकी देय असलेली व जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती अपिलार्थीस देण्यात आली असल्याचे दिसून येत आहे. तसेच यासंदर्भात अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयामध्ये बदल करण्याची आवश्यकता आयोगास वाटत नाही.

या सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक १२-१०-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सै.शौकत सै.कासीम, सी-६४४२, द्वारा-वरिष्ठ तुरुंगाधिकारी, पैठण खुले कारागृह,पैठण, जि.औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार (सा.प्र.),विभागीय आयुक्त कार्यालय,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. किशोर भिकनसिंग राजपूत,<br>एन-६, सिडको, ई-२३/१०, संभाजी कॉलनी, नवीन औरंगाबाद | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याध्यापक, संत कबीर माध्यमिक विद्यालय, नक्षत्रवाडी, तालुका जिल्हा औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/५२२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १२-१०-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. किशोर भिकनसिंग राजपूत | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, संत कबीर माध्यमिक विद्यालय, नक्षत्रवाडी, तालुका जिल्हा औरंगाबाद - तर्फे ॲड एस. बी. गस्तगार | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद - प्रतिनिधी - श्री. अशोक चव्हाण,अधीक्षक | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २९-१२-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २५-०१-२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २९-०१-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २६-०४-२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २८-०५-२०१० |

या प्रकरणाची सुनावणी यापूर्वी दि. १०.०५.२०११ रोजी घेण्यात आली होती. त्यावेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी यांचे वकील व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित होते. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांचे वकील श्री. गस्तगार यांनी प्रकरणात सुनावणीसाठी पुढील तारीख मिळण्याची आयोगास विनंती केली. त्यांची विनंती मान्य करुन सुनावणी पुढे ढकलण्यात आली होती. प्रकरणात आज दि. १२.१०.२०११ रोजी पुन्हा सुनावणी घेण्यात येत आहे. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे वकील श्री.गस्तगार व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांचे वकील यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी वीस वर्षापूर्वीची माहिती मागितली आहे. अशाच प्रकारची माहिती मागत असताना दुसऱ्या एका अपिलार्थीच्या प्रकरणात शाळेने पोलीस केस केलेली आहे. त्याचप्रमाणे अपिलार्थीच्या माहितीसाठीचा मूळ अर्ज परिपूर्ण नसून त्यामध्ये ते दारिद्रयरेषेखालील आहेत किंवा कसे याबाबतची नोंद केलेली नाही. अपिलार्थी यांचा या माहितीशी काहीही संबंध नाही किंवा ते शाळेचे कर्मचारीही नाहीत.या बाबीवरुन अपिलार्थी यांचे अपील फेटाळण्यात यावे, अशीही विनंती त्यांनी केली.

जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगास अवगत केले की, अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी घेऊन माहिती देण्यात यावी, असा निर्णय घेण्यात आला आहे.

अपिलार्थी यांनी त्यांना आतापर्यंत माहिती मिळाली नाही, असे आयोगापुढे सांगितले.

आयोगापुढील कागदपत्रे व युक्तिवादावरुन अपिलार्थी यांनी सन १९९० ते २०१० या कालावधीची संत कबीर माध्यमिक विद्यालय, नक्षत्रवाडी,औरंगाबाद या विद्यालयाशी संबंधित एकूण दहा विविध मुद्यांवर विस्तृत माहिती मागितलेली आहे, असे दिसून येत आहे. अशी माहिती एकत्रित करण्यास सार्वजनिक प्राधिकरणाकडील साधनसामग्री व मनुष्यबळ मोठया प्रमाणावर वळवावी लागते. ही बाब माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७(९) नुसार अपेक्षित नाही. यामुळे असा माहितीचा अर्ज अव्यवहार्य ठरतो. कारण अशाप्रकारच्या माहिती अर्जामुळे माहिती अधिकारामागील भूमिका व उद्दिष्ट सफल होत नाही. प्रसंगी अशाप्रकारच्या माहिती अर्जांवर केंद्रीय माहिती आयोगाने माहिती देण्याची आवश्यकता नाही असे निर्णय दिलेले आहेत.या सर्व बाबी विचारात घेता अपिलार्थीस आयोगाने सूचित केल्यानुसार त्यांनी मागितलेल्या माहितीची व्याप्ती स्वेच्छेने कमी केली व त्यांना खालील माहितीच्या प्रती देण्यात याव्या, अशी आयोगास विनंती केली.

"आज कार्यरत असलेल्या सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे शैक्षणिक प्रमाणपत्र, जातीचे प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र याच्या प्रती."

जन माहिती अधिकारी यांचे वकील श्री. गस्तगार यांनी आयोगापुढे केलेला - अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती अधिनियमातील कलम ८(१)(ङ) प्रमाणे देय होत नाही - हा युक्तिवाद आयोगास मान्य करता येत नाही. अशा प्रमाणपत्रांच्या आधारे संबंधितांना शासन सेवेची संधी

मिळालेली असल्याकारणाने सदर कागदपत्रांना सार्वजनिक स्वरुप प्राप्त होत आहे. त्याचप्रमाणे अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जामध्ये ते दारिद्र्यरेषेखालील आहेत किंवा कसे याचा उल्लेख केलेला नाही, असाही युक्तिवाद जन माहिती अधिकारी यांच्या वकिलांतर्फे आयोगासमोर मांडण्यात आला. तथापि या छोटया मुद्यावर माहितीचा अर्ज निष्प्रभ ठरत नाही, असे आयोगाचे मत आहे. उपरोक्त माहिती देय होत असल्यामुळे जन माहिती अधिकारी यांना वर नमूद केल्याप्रमाणे माहिती अपिलार्थीस देण्याची व्यवस्था करावी लागेल.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, संत कबीर माध्यमिक विद्यालय, नक्षत्रवाडी,ता.जि.औरंगाबाद यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थी यांनी स्वेच्छेने मर्यादित केलेल्या माहितीच्या प्रती हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवाव्यात.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १२-१०-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. किशोर भिकनसिंग राजपूत, एन-६, सिडको, ई-२३/१०, संभाजी कॉलनी, नवीन औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, संत कबीर माध्यमिक विद्यालय, नक्षत्रवाडी, तालुका जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. अर्जून साहेबराव नवपुते, : अपिलार्थी
रा. घारदोन, तालुका जिल्हा औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
मुख्याध्यापक, ज्ञानसागर प्राथमिक आश्रमशाळा, खोडेगांव,
तालुका जिल्हा औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी तथा :
विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी, औरंगाबाद
कार्यालय, औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/४४२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १२-१०-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याध्यापक, ज्ञानसागर प्राथमिक आश्रमशाळा, खोडेगांव,<br>तालुका जिल्हा औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी, औरंगाबाद<br>कार्यालय, औरंगाबाद - प्रतिनिधी - श्री. पी. जी.<br>चाबुकस्वार, कार्यालय अधीक्षक | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २४-१२-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २५-०१-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. २५-०३-२०१०

या प्रकरणाची सुनावणी यापूर्वी दिनांक ०३-०५-२०११ रोजी घेण्यात आली होती. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित होते. दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यासाठी त्यावेळी प्रकरणाची सुनावणी पुढे ढकलण्यात येऊन ती आज रोजी ठेवण्यात आली होती.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आयोगापुढील कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी त्यांच्या दिनांक २४-१२-२०१० च्या माहिती अर्जान्वये एकंदर बारा मुद्दयावर ज्ञानसागर प्राथमिक आश्रमशाळा, खोडेगांव, तालुका जिल्हा औरंगाबाद संबंधी विविध मुद्दयावर विस्तृत अशी माहिती मागितली आहे. सदरची माहिती अपिलार्थीस संबंधित शाळेकडून उपलब्ध करुन देण्यात आली आहे. याबाबत मुख्याध्यापक, ज्ञानसागर प्राथमिक आश्रमशाळा, खोडेगांव, तालुका जिल्हा औरंगाबाद यांनी विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी, औरंगाबाद यांना दिनांक २९-०३-२०१० च्या पत्राव्दारे कळविल्याचे दिसून येत आहे. तसेच अपिलार्थी यांनी दिनांक २९-०३-२०१० ला विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी, औरंगाबाद यांना त्यांच्या माहिती अर्जासंबंधात संपूर्ण माहिती मिळाली आहे असे लेखी कळविलेले दिसून येत आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक १२-१०-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. अर्जून साहेबराव नवपुते, रा. घारदोन, तालुका जिल्हा औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, ज्ञानसागर प्राथमिक आश्रमशाळा, खोडेगांव,

तालुका जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी, औरंगाबाद कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. सय्यद साबेर सय्यद सरदार, : अपिलार्थी
हिना मंजील, मलीक अंबर उड्डाणपूल जवळ, टाऊन हॉल,
औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
वैद्यकीय सामाजिक कार्यकर्ता, जिल्हा परिषद,
समाजकल्याण विभाग, औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी, :
समाजकल्याण विभाग, जिल्हा परिषद, औरंगाबाद

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/४४३ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १२-१०-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>कार्यालय अधीक्षक, समाजकल्याण कार्यालय, जिल्हा परिषद, औरंगाबाद - श्री. मोरे एन. एन. | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी,<br>समाजकल्याण विभाग, जिल्हा परिषद, औरंगाबाद | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०४-०१-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. ०५-०२-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ३०-०३-२०१० |

या प्रकरणाची सुनावणी यापूर्वी दिनांक ०३-०५-२०११ रोजी घेण्यात आली होती. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित होते. त्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते. दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यासाठी त्यावेळी प्रकरणाची सुनावणी पुढे ढकलण्यात येऊन ती आज रोजी ठेवण्यात आली होती.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती त्यांना दिनांक ०३-०५-२०११ च्या पत्रान्वये देण्यात आली आहे. हि माहिती एकंदर सोळा शाळांची व ६८० अपंग / विकलांग मुलांबाबतची आहे. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी अशा प्रकारची माहिती देण्यापुर्वी भविष्यात माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (७) व ११ अन्वये त्रयस्थांची बाजू ऐकून घेऊन नंतरच माहिती देण्याचा विचार करावा असे आयोगातर्फे सुचित करण्यात येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १२-१०-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सय्यद साबेर सय्यद सरदार, हिना मंजील, मलीक अंबर उड्डाणपूल जवळ, टाऊन हॉल, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधीक्षक, समाजकल्याण कार्यालय, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी, समाजकल्याण विभाग, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४.		निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. संजय नामदेव पाटील, : अपिलार्थी
एन-९, आर/२३५, म्हाडा कॉलनी, रायगड नगर, बळीराम पाटील शाळेजवळ, औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
विशेष भूसंपादन अधिकारी, व्दारा, जिल्हाधिकारी कार्यालय, जळगांव

जन अपिलीय अधिकारी तथा :
निवासी उपजिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, जळगांव

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/४५० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १२-१०-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. संजय नामदेव पाटील | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा विशेष भूसंपादन अधिकारी, व्दारा, जिल्हाधिकारी कार्यालय, जळगांव - प्रतिनिधी - श्री. डी. के. पाटील, मंडळ अधिकारी | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, जळगांव | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १९-०१-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २२-०२-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. २९-०३-२०१०

या प्रकरणाची सुनावणी यापूर्वी दिनांक ०३-०५-२०११ रोजी घेण्यात आली होती. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित होते. त्यांचे म्हणणे ऐकून घेण्यासाठी त्यावेळी प्रकरणाची सुनावणी पुढे ढकलण्यात येऊन ती आज रोजी ठेवण्यात आली होती.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी दिनांक १९-०१-२०१० रोजीच्या माहिती अर्जान्वये एकूण पाच मुद्दयावर माहिती मागितली आहे. त्यापैकी चार मुद्दयावरील माहिती अपिलार्थीस दिनांक ०५-०४-२०१० रोजी पोस्टाने पाठविण्यात आली आहे. अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी सदरची माहिती मिळाली आहे ही बाब मान्य केली. तथापि त्यांना एका मुद्दयावरील माहिती म्हणजे नोटीशीची प्रत मिळाली नाही असे सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले. जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने सदर नोटीशीची प्रत आज रोजी सोबत आणली आहे ती आयोगाच्या सूचनेनुसार अपिलार्थीस देण्यात आली. जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने पुढे आयोगास असेही अवगत केले की, ही नोटीस अपिलार्थीच्या नावावर नसून मध्यंतरीच्या काळात इतरांच्या नावावर जमीन वर्ग झाल्यामुळे त्यांच्या नावाची आहे. अपिलार्थीस ही बाब मान्य आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक १२-१०-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. संजय नामदेव पाटील, एन-९, आर/२३५, म्हाडा कॉलनी, रायगड नगर, बळीराम पाटील शाळेजवळ, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा विशेष भूसंपादन अधिकारी, व्दारा, जिल्हाधिकारी कार्यालय, जळगांव यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, जळगांव यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. शेख हबीब पाशा पि. गुलाम रसूल, : अपिलार्थी
घर नं. १-१६-३२, जुना बाजार, औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्ड, पानचक्की, औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा :
मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्ड,
औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/४५५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १२-१०-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. शेख हबीब पाशा पि. गुलाम रसूल | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी,<br>महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्ड, पानचक्की, औरंगाबाद<br>- श्री. एस. एन. जफर | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्ड,<br>औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २४-१२-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १३-०१-२०१० |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०६-०२-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | पत्रावर दिनांक नाही |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ३१-०३-२०१० |

या प्रकरणाची सुनावणी यापूर्वी दिनांक ०३-०५-२०११ रोजी घेण्यात आली होती. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित होते. दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यासाठी त्यावेळी प्रकरणाची सुनावणी पुढे ढकलण्यात येऊन ती आज रोजी ठेवण्यात आली होती.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

अपिलार्थी यांनी दिनांक २४-१२-२००९ च्या माहिती अर्जान्वये मागितलेली माहिती संदिग्ध स्वरुपात असून कलम २ (j) मधील उप कलमचा उल्लेख केला आहे याबाबतचा खुलासा करावा असे आयोगाने सुरुवातीस अपिलार्थीस सूचित केले तथापि अपिलार्थी या बाबत खुलासा देऊ शकले नाहीत. जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, त्यांच्या कार्यालयातर्फे पॅनल ऑफ ॲडव्होकेटची नियुक्ती केलेली नाही त्यामुळे अपिलार्थी यांनी अपेक्षित केलेली माहिती देता आली नाही, ही बाब त्यांना अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाने कळवावी लागेल.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १२-१०-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. शेख हबीब पाशा पि. गुलाम रसूल, घर नं. १-१६-३२, जुना बाजार, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्ड, पानचक्की, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्ड,

औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. राजेंद्र गंगाधर उगले, : अपिलार्थी
मु. पो. कांताई निवास, यशवंतनगर, पैठण, तालुका पैठण,
जिल्हा औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
वरिष्ठ लिपीक, नगर परिषद, पैठण, जिल्हा औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा :
मुख्याधिकारी, नगर परिषद, पैठण, जिल्हा औरंगाबाद

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/४५६ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १२-१०-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>वरिष्ठ लिपीक, नगर परिषद, पैठण, जिल्हा औरंगाबाद | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्याधिकारी, नगर परिषद, पैठण, जिल्हा औरंगाबाद | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. १७-११-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १७-१२-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ३१-०३-२०१० |

या प्रकरणाची सुनावणी यापूर्वी दिनांक ०४-०५-२०११ रोजी घेण्यात आली होती. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित होते. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी

उपस्थित होते. त्यांनी प्रकरणात सद्यस्थिती आयोगास अवगत करण्यसाठी मुदतवाढ मागितली. त्यांची ही विनंती मान्य करण्यात येऊन त्यावेळी प्रकरणाची सुनावणी पुढे ढकलण्यात येऊन ती आज रोजी ठेवण्यात आली होती.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. प्रकरणात सद्यस्थिती आयोगास अवगत होऊ शकत नाही. प्रकरणात दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटते. यास्तव सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. सुनावणीची पुढील तारीख यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी व्यक्तिशः उपस्थित राहणे आवश्यक राहील.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**अंतरिम आदेश**

या व्दितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. सुनावणीची पुढील तारीख यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व वस्तुनिष्ठ माहितीनिशी व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक १२-१०-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. राजेंद्र गंगाधर उगले, मु. पो. कांताई निवास, यशवंतनगर, पैठण, तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ लिपीक, नगर परिषद, पैठण, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, पैठण, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. बी. एम. पठाण,<br>प्लॉट नं. ७१, महात्मा ज्योतिबा फुले हौसिंग सोसायटी,<br>जटवाडा रोड, हर्सूल, औरंगाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| जन माहिती अधिकारी,<br>सह संचालक, आरोग्य सेवा (कुष्ठरोग/क्षयरोग), पुणे, कुटूंब कल्याण भुवन आवार, नायडु हॉस्पिटल कंपाऊंड, पुणे रेल्वे स्टेशन समोर, पुणे - ०१ | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>सह संचालक, आरोग्य सेवा (कुष्ठरोग/क्षयरोग), पुणे, विश्रांतवाडी, येरवाडा मेन्टल हॉ. कार्नर, पुणे - ०६ | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/४६० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १२-१०-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी,<br>सह संचालक, आरोग्य सेवा (कुष्ठरोग/क्षयरोग), पुणे, कुटूंब कल्याण भुवन आवार, नायडु हॉस्पिटल कंपाऊंड, पुणे रेल्वे स्टेशन समोर, पुणे - ०१ | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>सह संचालक, आरोग्य सेवा (कुष्ठरोग/क्षयरोग), पुणे, विश्रांतवाडी, येरवाडा मेन्टल हॉ. कार्नर, पुणे - ०६ | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०९-११-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. २०-०१-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १२-०४-२०१० |

या प्रकरणाची सुनावणी यापूर्वी दिनांक ०४-०५-२०११ रोजी घेण्यात आली होती. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित होते. प्रकरणात दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटल्याने त्यावेळी प्रकरणाची सुनावणी पुढे ढकलण्यात येऊन ती आज रोजी ठेवण्यात आली होती.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. प्रकरणात सद्यस्थिती आयोगास अवगत होऊ शकत नाही. प्रकरणात दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटते. यास्तव सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. सुनावणीची पुढील तारीख यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी व्यक्तिशः उपस्थित राहणे आवश्यक राहील.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## अंतरिम आदेश

या व्दितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. सुनावणीची पुढील तारीख यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व वस्तुनिष्ठ माहितीनिशी व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १२-१०-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. बी. एम. पठाण, प्लॉट नं. ७१, महात्मा ज्योतिबा फुले हौसिंग सोसायटी, जटवाडा रोड, हर्सूल, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी, सह संचालक, आरोग्य सेवा (कुष्ठरोग/क्षयरोग), पुणे, कुटूंब

कल्याण भुवन आवार, नायडु हॉस्पिटल कंपाऊंड, पुणे रेल्वे स्टेशन समोर, पुणे - ०१ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सह संचालक, आरोग्य सेवा (कुष्ठरोग/क्षयरोग), पुणे, विश्रांतवाडी, येरवाडा मेन्टल हॉ. कार्नर, पुणे - ०६ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. ई. टी. काळे, : अपिलार्थी
रा. खुपटा, पो. मादणी, तालुका सिल्लोड,
जिल्हा औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
तहसीलदार, तहसील कार्यालय, सिल्लोड,
जिल्हा औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी तथा :
उप विभागीय अधिकारी, उप विभागीय अधिकारी
कार्यालय, सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/४७३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १२-१०-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. ई. टी. काळे | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, सिल्लोड,<br>जिल्हा औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>उप विभागीय अधिकारी, उप विभागीय अधिकारी<br>कार्यालय, सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २३-०९-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २८-१०-२००९ |

| | | |
|---|---|---|
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १७-१२-२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०७-०४-२०१० |

या प्रकरणाची सुनावणी यापूर्वी दिनांक ०४-०५-२०११ रोजी घेण्यात आली होती. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित होते. दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यासाठी त्यावेळी प्रकरणाची सुनावणी पुढे ढकलण्यात येऊन ती आज रोजी ठेवण्यात आली होती.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या दिनांक २३-०९-२००९ च्या माहिती अर्जान्वये मागितलेली माहिती त्यांना प्राप्त झाल्याचे सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १२-१०-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. ई. टी. काळे, रा. खुपटा, पो. मादणी, तालुका सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी, उप विभागीय अधिकारी कार्यालय, सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. राजेंद्र हनुमंतराव पोतदार, : अपिलार्थी
रा. लक्ष्मीनगर, बसस्टॅडच्या मागे, वसमत, तालुका वसमत,
जिल्हा हिंगोली

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, हिंगोली
जन अपिलीय अधिकारी तथा :
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, हिंगोली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/६४० | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १२-१०-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, हिंगोली | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, हिंगोली | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. २९-११-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. ३१-१२-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १७-०२-२०११ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १४-०३-२०११ |

या प्रकरणाची सुनावणी यापूर्वी दिनांक २८-०४-२०११ रोजी घेण्यात आली होती. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी अनुपस्थित होते. जन अपिलीय अधिकारी

उपस्थित होते. त्यांचे म्हणणे ऐकून घेण्यासाठी त्यावेळी प्रकरणाची सुनावणी पुढे ढकलण्यात येऊन ती आज रोजी ठेवण्यात आली होती.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, त्यांनी या पदाचा नुकताच कार्यभार स्विकारला आहे. विचाराधीन माहिती अर्जाच्याबाबत त्यांनी पुनश्च कार्यालयीन कागदपत्राची पडताळणी केली. त्यामध्ये त्यांना पुरस्कारप्राप्त शिक्षकांची यादी प्राप्त झाली ती त्यांनी अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाने पाठविली आहे. अपिलार्थीने मागितलेल्या उर्वरीत माहितीपैकी आदर्श शिक्षकांची संपूर्ण माहिती व प्रस्तावाची प्रत, तसेच संचालकाला दिलेली पत्राची माहिती इत्यादी त्यांच्या कार्यालयात शोध घेऊनही उपलब्ध होऊ शकली नाही. सदरची माहिती शिक्षण संचालक, महाराष्ट्र शासन शिक्षण संचालनालयाकडे उपलब्ध होऊ शकते.

अपिलार्थी दिनांक २८-०४-२०११ च्या सुनावणीस उपस्थित होते आजच्या सुनावणीस अनुपस्थित आहेत. वर नमूद केल्याप्रमाणे जी कागदपत्रे उपलब्ध झाली आहेत ती जन माहिती अधिकारी यांना परत एकदा अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाने पाठवावी लागतील. उर्वरीत माहितीसाठी अपिलार्थी यांनी शिक्षण संचालक, महाराष्ट्र शासन शिक्षण संचालनालयाकडेअर्ज करणे उचित राहील.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १२-१०-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. राजेंद्र हनुमंतराव पोतदार, रा. लक्ष्मीनगर, बसस्टॅडच्या मागे, वसमत, तालुका वसमत, जिल्हा हिंगोली.

२. जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. रविंद्र बळीराम मोरे, : अपिलार्थी
रा. साळेगाव, पो. सांडस, तालुका कळमनुरी,
जिल्हा हिंगोली

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
सहायक जिल्हा पुरवठा अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली

जन अपिलीय अधिकारी तथा :
जिल्हा पुरवठा अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/८०३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १२-१०-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>सहायक जिल्हा पुरवठा अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>जिल्हा पुरवठा अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ३०-११-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १६-१२-२०१० |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १५-०१-२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २२-०२-२०११ |

या प्रकरणाची सुनावणी यापूर्वी दिनांक २७-०४-२०११ रोजी घेण्यात आली होती. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित होते. दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यासाठी त्यावेळी प्रकरणाची सुनावणी पुढे ढकलण्यात येऊन ती आज रोजी ठेवण्यात आली होती.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक ११-१०-२०११ च्या पत्रान्वये विधान मंडळ रोहयो समिती हिंगोली दौ-यावर येत असल्यामुळे मुख्यालयी हजर राहणे आवश्यक असल्यामुळे सुनावणी पुढे ढकलण्यात यावी अशी विनंती केली आहे.

आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी दिनांक ३०-११-२०१० च्या माहिती अर्जान्वये किरकोळ केरोसीन परवाने मंजुरीबाबत विविध १३ मुद्दयावर माहिती मागितली आहे. अपिलार्थी माहिती व्यक्तिशः घेणार आहेत. अपिलार्थीस दिनांक २१-१२-२०१० च्या पत्रान्वये जन माहिती अधिकारी तथा सहायक जिल्हा पुरवठा अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली यांनी एकंदर ६६ पृष्ठांची माहिती पाठविली आहे असे दिसून येत आहे. अपिलार्थी यांना दोनदा संधी देण्यात आली होती तथापि ते उपस्थित नव्हते. उपलब्ध कागदपत्रावरुन त्यांना माहिती मिळाल्याचे दिसून येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १२-१०-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. रविंद्र बळीराम मोरे, रा. साळेगाव, पो. सांडस, तालुका कळमनुरी, जिल्हा हिंगोली.

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक जिल्हा पुरवठा अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय,

हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा पुरवठा अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. शिशिर विश्वासराव साने, : अपिलार्थी
अफसर मंजील, ब्लॉक नं. १, जुने तार ऑफिस मागे,
पिवळा बंगला, जालना

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
प्राचार्य, गोदावरी फाऊंडेशन, कॉलेज ऑफ नर्सिंग, डॉ. उल्हास पाटील मेडिकल कॉलेज, रा. म. ६, साकेगाव, भुसावळ रोड, जळगांव

जन अपिलीय अधिकारी तथा :
अध्यक्ष, गोदावरी फाऊंडेशन, कॉलेज ऑफ नर्सिंग, डॉ. उल्हास पाटील मेडिकल कॉलेज, रा. म. ६, साकेगाव, भुसावळ रोड, जळगांव

१ अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२१८५

२ सुनावणीची तारीख दि. १२-१०-२०११

३ आज रोजीची उपस्थिती

३.१ अपिलार्थी - श्री. शिशिर विश्वासराव साने : उपस्थित

३.२ जन माहिती अधिकारी तथा : अनुपस्थित
प्राचार्य, गोदावरी फाऊंडेशन, कॉलेज ऑफ नर्सिंग, डॉ. उल्हास पाटील मेडिकल कॉलेज, रा. म. ६, साकेगाव, भुसावळ रोड, जळगांव

३.३ जन अपिलीय अधिकारी तथा : अनुपस्थित
अध्यक्ष, गोदावरी फाऊंडेशन, कॉलेज ऑफ नर्सिंग, डॉ. उल्हास पाटील मेडिकल कॉलेज, रा. म. ६, साकेगाव, भुसावळ रोड, जळगांव

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ०९-०६-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. ०१-०८-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०५-१०-२००९ फेरसादर दिनांक २१-११-२००९ |

या प्रकरणाची सुनावणी यापूर्वी दिनांक २९-०३-२०११ रोजी घेण्यात आली होती. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांचे वकील उपस्थित होते. शासनाकडील संचालक यांची साक्ष आयोगास आवश्यक वाटल्याने त्यांच्या साक्षीकरिता त्यावेळी प्रकरणाची सुनावणी पुढे ढकलण्यात येऊन ती दिनांक २८-०६-२०११ रोजी ठेवण्यात आली होती. सदर सुनावणीसही जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व संचालक (आरोग्य सेवा) उपस्थित नसल्याने त्यांची बाजू ऐकूण घेण्यासाठी परत सुनावणी पुढे ढकलण्यात येऊन, ती आज रोजी ठेवण्यात आली होती.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी उपस्थितआहेत. त्यांची बाजू ऐकून घेण्यात आली. शासनाकडील संचालक यांच्या साक्षीकरिता प्रकरणाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## अंतरिम आदेश

या व्दितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. सुनावणीची पुढील तारीख यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी, उप संचालक (आरोग्य सेवा) आणि संचालक (आरोग्य सेवा) यांनी सर्व वस्तुनिष्ठ माहितीनिशी व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक १२-१०-२०११**

-------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. शिशिर विश्वासराव साने, अफसर मंजील, ब्लॉक नं. १, जुने तार ऑफिस मागे, पिवळा बंगला, जालना.

२. जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, गोदावरी फाऊंडेशन, कॉलेज ऑफ नर्सिंग, डॉ. उल्हास पाटील मेडिकल कॉलेज, रा. म. ६, साकेगांव, भुसावळ रोड, जळगांव यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अध्यक्ष, गोदावरी फाऊंडेशन, कॉलेज ऑफ बीएस्सी नर्सिंग, डॉ. उल्हास पाटील मेडिकल कॉलेज, रा. म. ६, साकेगांव, भुसावळ रोड, जळगांव यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. उप संचालक (आरोग्यसेवा) नाशिक मंडळ नाशिक, जिल्हा रुग्णालय आवार, त्र्यंबक रोड, नाशिक - ४२२ ००१ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. संचालक (आरोग्यसेवा) आरोग्यभवन, सेंट जॉर्ज हॉस्पिटल आवार, मुंबई - ४०० ००१ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६. निर्णय नस्ती.